नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

जुलै
१९६२

★

या ५० न. पैसे

या अंकात

* कुमुदिनी घारपुरे, एम्. ए.
* प्रा. श्री. मा. कुलकर्णी
* प्रा. भ. श्री. पंडित
* प्रा. भा. श्री. परांजपे
* रवीन्द्र बोरगांवकर
* माधव जामदार
* प्रा. म. बा. कुंडले

शिवाय, संपादकीय,
परिचय-परामर्श इ०

संपादकः- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक २२ जुलै १९६२ रोजी दुपारी ४ वाजता नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरेल.

सभेपुढील विषय—

१. मागील सभेचा अहवाल.

२. गतवर्षीचे कार्यवृत्त.

३. १९६१–६२ सालचे हिशेबतपासनीसांनी तपासलेले हिशेब.

४. १९६२–६३ चे अंदाजपत्रक.

५. १९६२–६३ करिता अधिकृत हिशेबतपासनीसांची नेमणूक.

६. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. सभासदांना सभेत ठराव किंवा सूचना मांडावयाची असल्यास ती लेखी स्वरूपात सभेपूर्वी चार दिवस अगोदर केंद्रीय कार्यालयात पोहोचावयास पाहिजे.

ह्या सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

दि. ३०–६–१९६२
वि. सा. संघ, नागपूर

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र--

:: संपादक मंडळ ::

भा. श्री. परांजपे

व. कृ. वऱ्हाडपांडे

मा. गो. वैद्य

युगवाणी

संपादक:--श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १७] जुलै १९६२ [अंक ३

अनुक्रमणिका

क्रमांक	विषय	पृष्ठ
१	संपादकीय	२
२	कलेतील सामान्य आणि विशेष	५
३	शाहिरी वाङ्मय (एक चर्चा)	९
४	डायरीतून अेक पान (कविता)	१९
५	काय तुला द्यावे ?	२०
६	नाना जोगांचे 'भारती'	२१
	परिचय परामर्श	
७	अनामिकांची चिंतनिका	२६
८	बालवाङ्मय	३२

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

साहित्याचा प्रसार

गेल्या फेब्रुवारी महिन्यात मुंबई येथे प्रा. ना. सी. फडके यांचा, त्यांना पद्मभूषण ही पदवी मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी गेल्या पन्नास वर्षातील मराठी साहित्याच्या वाटचालीचा आढावा घेणारे अेक महत्वपूर्ण भाषण प्रा. फडक्यांनी केले. हा आढावा घेताना जशा कांही हर्षोर्मि त्यांच्या अंतःकरणात उठल्या तशी कांही शल्येहि त्यांच्या हृदयाला बोचली. या दोन्हींचेहि सकारण विवेचन प्रा. फडक्यांनी केले आहे व ही शल्ये नाहीशी होण्यासाठी काय करायला पाहिजे याचेहि त्यांनी दिग्दर्शन केले आहे. या भाषणात विवेचिलेले अनेक मुद्दे महत्वाचे असून त्यांचा गंभीरपणे विचार होणे अवश्य आहे. 'ही सात शल्ये मनी' या नांवाने स्वतंत्र पुस्तिका रुपाने प्रकाशित झालेल्या या भाषणाकडे आम्ही वाचकांचे लक्ष या पूर्वीच वेधले होते (मे, १९६२). साहित्याचा प्रसार त्याची प्रगति व त्याची प्रतिष्ठा या तीन गोष्टींचा प्रा. फडक्यांनी प्रामुख्याने विचार केला आहे. प्रस्तुत त्यापैकी प्रसाराच्या मुद्याविषयी कांही विचार मांडण्याचा मानस आहे.

गेल्या पन्नास वर्षात मराठी साहित्याचा 'छापिल संसार' पुष्कळच वाढला असला तरी ज्याचा संतोष आणि अभिमान वाटावा असा हा प्रसार आहे काय? असा प्रश्न करून प्रा. फडके म्हणतात की, साहित्याच्या प्रसाराच्या बाबतीत कोणता पल्ला गाढण्याचं ध्येय असावं तर समाजाच्या सर्व थरातील सर्व व्यक्तीपर्यंत प्रकाशित साहित्य पोचविण्याचें, हा पल्ला आपण गाठला तर नाहीच परंतु त्याच्या फार फार अलीकडे आपण रेंगाळत आहोत असं म्हणून प्रा. फडक्यांनी एक गणित मांडून दाखविले आहे. सर्वात जास्त खपणाऱ्या दैनिकाच्या एक लक्ष प्रती खपतात असं मानून वृत्तपत्रीय साहित्य का होईना ते ज्यांच्या पर्यंत पोचतं असे एक लक्ष लोक आहेत असे ते म्हणतात. आणि चार कोटी मराठी भाषिकांपैकी एक लक्ष हे प्रमाण कितीसे अभिमानास्पद आहे असे ते विचारतात. साहित्याचा जो काही प्रसार आज झाला आहे तो अभिमानास्पद नाही असे म्हटले आणि त्याच्या प्रसाराला अजून पुष्कळच वाव आहे हे मान्य केले तरी एक लक्ष लोकांचे जे हे गणित प्रा. फडक्यांनी केले आहे ते पूर्णतः बरोबर नाही. एक तरी लहान मोठ्या सर्व दैनिकांच्या खपाचा एकूण आकडा एकत्र विचारात घ्यायला पाहिजे. आणि प्रत्येक प्रत ही सरासरीने दहा व्यक्तींच्या कडून वाचली जाते असे मानून हिशोब करायला पाहिजे. वृत्तपत्राशिवाय इतर जी नियतकालिके आहेत त्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सर्वांचा खपहि जमेला धरला पाहिजे. हे सर्व विचारात घेऊन गणित मांडल्यास ते वीस लक्षा पर्यंतहि कदाचित जाईल. अर्थात चार कोटीत वीस लक्ष म्हणजेहि शेकडा ५ च व हेहि प्रमाण नगण्य आहे, हे मान्य करावेच लागेल. ग्रंथगत साहित्याचा प्रसार याहून कितीतरी अल्प असणार. त्यातहि जे लिखाण साहित्य या दर्जाला व प्रतिष्ठेला पात्र असेल अशाचा प्रसार तर आणखी कमी असणार. तेव्हा प्रा. फडके यांनी मांडलेले गणित जरी थोडेसे चुकलेले असले तरी त्यावरून त्यांनी काढलेले निष्कर्ष चुकीचे ठरत नाहीत.

आपला समाज आणि आपलं साहित्य या मधील हे प्रचंड अंतर नाहीसं होण्यासाठी कुणी कोणते प्रयत्न केले पाहिजेत यासंबंधी प्रा. फडक्यांनी ज्या महत्वाच्या सूचना केल्या आहेत त्यांचा विचार करण्यापूर्वी साहित्याच्या प्रसाराच्या बाबतीतील ध्येया संबंधीच मला एक निराळा विचार येथे मांडावासा वाटतो. समाजाच्या सर्व थरातील सर्व व्यक्तींपर्यंत प्रकाशित साहित्य पोचलं पाहिजे हे जे ध्येय प्रा. फडके यांनी समोर ठेवले आहे ते अशक्य कोटीतील तर आहेच परंतु अनावश्यकहि आहे. साहित्य हा एक उच्च पातळीवरील मनोव्यापार आहे. लेखक व वाचक यांच्यात चालणारा हा व्यापार आहे साहित्याची निर्मिती करण्यासाठी जशी कांही एक पात्रता व्यक्तीच्या अंगी असावी लागते तशीच ती त्या साहित्याचा आस्वाद घेणाऱ्या रसिकाच्या ठिकाणीहि असावी लागते. 'प्रतिभा-साधनकारांना' हे मान्य असावे. साहित्यिकाला आवश्यक ती पात्रता केवळ अभ्यासाने येणे शक्य नाही. तेथे दैवी देणगीची अपेक्षा आहे. परंतु साहित्यिकाचा प्रश्न प्रस्तुत नाही. वाचकांच्या ठिकाणी रसिकता आणणे हे १०० टक्के नसले तरी बरेचसे प्रयत्न साध्य आहे. पण तरीहि एकूण एक व्यक्तीला रसिक बनविणे शक्य आहे काय ? साक्षरतेच्या प्रसाराने फार तर वृत्तपत्रांचा वाचक तयार होऊ शकेल. रसिक तयार होऊ शकणार नाही. आणि साहित्याची निकोप वाढ होण्यासाठी व त्याची बूज राहण्यासाठी रसिकांचीच आवश्यकता असते. असे रसिक संख्येने कमीच राहणार, पण त्याबद्दल विशेष खंत करण्याचे कारण आहे असे मला वाटत नाही. ज्ञानेश्वरादि संतांनी समाजातील सर्व थरापर्यंत आपले साहित्य पोचविले असे प्रा. फडके म्हणतात ते सत्य असले तरी अर्धसत्य आहे. संतांनी साहित्याला साधन करून त्याच्या द्वारा अध्यात्मशास्त्र व त्यावर आधारलेली नैतिक शिकवण या गोष्टी बहुजन समाजापर्यंत त्यांनी पोचविल्या. आणि तरी देखील अध्यात्मशास्त्राचे खरे अधिकारी वाचक त्यांना लाभले असे म्हणता येणार नाही. स्वतः ज्ञानेश्वरांनीच 'अध्यात्मशास्त्री इथे । एकु अंतरंगाचि अधिकारिये । येरू जन वाक्चातुर्ये । सुखिया होईल' यात अधिकारी व अनधिकारी असे वर्गीकरण सूचित केले आहे. तात्पर्य बहुजन समाजापर्यंत जे पोचलं ते साहित्य नव्हे. ज्ञानेश्वरीचे किंवा गाथ्यांचे आजहि जे हजारो वाचक आहेत ते

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य म्हणून या ग्रंथाकडे पाहणारे किंवा त्यातील साहित्याचा आस्वाद घेणारे नव्हेत. मुख्य मुद्दा हा की रसिकांची संख्या ही केव्हाहि कमीच असणार आणि ती कमी असली म्हणून कांही बिघडत नाही. एखादी साहित्यकृति जागतिक कीर्तीची आहे असं जेव्हां आपण म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ जगातील बहुसंख्य लोकांना ती माहीत अगर मान्य असते असा नसतो. साहित्याचे व त्याला अनुसरुन वाचकांचेहि अनेक थर असतात. साहित्याचे उच्चनीच स्तर व वाचकांचे अधिकारभेद व अवस्थाभेद साहित्याच्या प्रसाराचा विचार करताना ध्यानात घ्यावे लागतात. ते ध्यानात घेतले म्हणजे उच्च दर्जाच्या साहित्याचा आस्वाद घेऊ शकणारे रसिक कमीच असणार हे सहज पटू शकेल असे वाटते. आणि या दृष्टीनेच सर्वच साहित्य सर्वांच्या पर्यंत पोचण्याचे ध्येय अव्यवहार्य व अनावश्यकहि आहे असे मी म्हणतो.

अर्थात साहित्याच्या प्रसाराचे स्वाभाविकतःच मर्यादित असे जे क्षेत्र आहे त्या क्षेत्रातहि मराठी साहित्याच्या पुरते बोलायचे झाल्यास पुष्कळत्र करण्यासारखे आहे ही गोष्ट नाकारता येत नाही. त्या दृष्टीनेच प्रा. फडक्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा विचार व्हायला हवा. पुस्तकांचे मुद्रण, प्रकाशन इत्यादि कमी खर्चात व्हायला पाहिजे व वाचकांना स्वस्तात ती पुस्तके मिळाली पाहिजेत हीं अपेक्षा रास्त आहे. व त्यासाठी राज्य व केंद्र उभय सरकारांनी अवश्य ते सहाय्य केले पाहिजे. रशिया, चीन किंवा अमेरिका या देशांची सरकारे ज्या प्रमाणे आपापल्या साहित्याच्या प्रसारासाठी सुबक व आकर्षक छपाई पासून तो ते साहित्य कमी किंमतीत उपलब्ध करून देण्यापर्यंत जे प्रयत्न करीत असल्याचे प्रा. फडक्यांनी निदर्शनाला आणले आहे ते आमच्याहि सरकारांना अनुकरणीय आहे. मात्र या प्रचाराने प्रा. फडक्यांना अभिप्रेत असलेला साहित्याचा प्रसार कितपत होईल हे मात्र शंकास्पद आहे. कारण प्रचार निराळा व प्रसार निराळा.

साहित्याच्या क्षेत्रात सरकार हा एक सहावा घटक प्रविष्ट झाला आहे ही गोष्ट खरी. परंतु या घटकाचा हा प्रवेश साहित्याच्या स्वाभाविक प्रसाराला व निकोप वाढीला पोषक ठरेल की मारक ठरेल हे कालांतरानेच दिसून येणार आहे. आज या घटकाच्या हस्तक्षेपाच्या बाबतीत कांही सावधगिरीच्या सूचना करणेच शक्य व आवश्यकहि आहे. कांही ग्रंथांना व ग्रंथकारांना पारितोषिकं देण्यानं साहित्याच्या वाढीचा प्रश्न सुटणार नाही असे प्रा. फडके म्हणतात ते खरे आहे. आज घडीला सरकार कडून होणारे हे प्रयत्न फडके म्हणतात त्याप्रमाणे अपुरे तर आहेतच, परंतु योग्य ती काळजी न घेतल्यास ते विघातकहि ठरण्याचा संभव आहे. 'पारितोषिक प्राप्त' असे एक नवे व खोटे मूल्य साहित्याच्या क्षेत्रात शिरत असल्याचा इशारा मी यापूर्वीच युगवाणीतूनच दिलेला आहे.

(पृष्ठ १८ वर)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कलेतील सामान्य आणि विशेष

--कुमुदिनी घारपुरे, एम्. ए.

'Art cannot be better defined than as the creation or expression of the Beautiful.'

असे हडसनने म्हटले आहे. रंगरेखांच्या सहाय्याने चित्रकला, स्वरांच्या बोलीतून गायनकला, अभिनयाच्या भाषेतून नृत्यकला, आणि मानवी विकारांच्या साधनाने ललितकला आपले मनोगत व्यक्त करीत असते, सौंदर्य फुलवीत असते आणि सात्त्विक व शुद्ध आनंद निर्मीत असते.

ललितकलेत–ललितवाङ्मयात आनंद देण्यासाठी रसतत्त्वाच्या सहाय्याने अनुभूति घडवणे अवश्य असते; आणि ही अनुभूति उत्कटत्वाने घडायला हवी असेल तर त्यासाठी कलावंत लेखकाला कल्पना मूर्त करावी लागते. ही कल्पना म्हणजे लेखकाचे कांहीएक तत्त्व, सामाजिक समस्या, भावना, निसर्गसौंदर्य, परिस्थिति, जीवनविषयक तत्त्वज्ञान यासारखा अमूर्त विषय असतो. हा अमूर्त विषय लोकांच्या मनावर बिंबवण्यासाठी अंतःकरणापर्यंत पोहोंचवण्यासाठी लेखक त्यास मूर्त करु पाहतो. कारण अमूर्तापेक्षा मूर्ताचे आवाहन जास्त असते. अमूर्त विषयास अनुरुप अशा कथाप्रसंगांच्या व व्यक्तिविकारांच्या कौशल्यपूर्ण गुंफणीतून लेखकाला आपले तत्त्व सिद्ध करावयाचे असते. या तत्त्वाला मूर्तिमंत करणे, अमूर्त कल्पनांना मूर्त रूप देणे, ते शब्दात चित्रून दाखवणे हीच कलावंताची कला ! महाभारतात ठायीठायी जीवनविषयक तत्त्वज्ञान, रामायणात मानवी मनोविकार, कालिदासात निसर्गवर्णन साकार झालेले दिसेल. हरिभाऊ आपटयांनी सामाजिक समस्या (पण लक्षांत कोण घेतो. . .), फडक्यांनी जीवनातील मौलिक सिद्धांत (दौलत), मालतीबाई बेडेकरांनी परिस्थिति (बळी), कुसुमाग्रजांनी द्वंद्वकल्पना व निसर्ग (अहिनकुल) इतके सजीव केले आहे की तेथे कला हे मूर्तिमंत झालेले तत्त्व आहे याची साक्ष पटते. जेम्स स्टुअर्ट मिलने म्हटलेच आहे, "What is poetry but the thought and words in which emotion spontaneously embodies itself."

पण अमूर्त कल्पनांना मूर्त रूप यशस्वी रीतीने द्यायचे असेल, अनुभूति घडवायची असेल तर कलावंताला विश्वव्यापी तत्त्वाकडून वैयक्तिकतेकडे वाटचाल करावी लागते. सामान्य सिद्धांत टाळून, वैयक्तिक जीवनावर व भावनांवर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लक्ष केंद्रित करून, त्यातून सामान्याचे स्वर कलावंताने ऐकवायला हवेत. म्हणजेच ललित लेखक विशेषरूपाबद्दल, विशिष्टाबद्दल बोलतो व त्यातून सामान्यसिद्धांत ध्वनित करतो. 'वळी' कादंबरीत मालतीबाई बेडेकरांनी 'आवा' या व्यक्तीबद्दल –विशेषाबद्दल–बोलताना "आकांक्षामुळे, असंतोष निर्माण होतो; सर्वं दुःखं विवेकिनः।' हा सामान्यसिद्धांत ध्वनित केला आहे. मांगगारुडयासारख्या गुन्हेगार जमातीत जन्म गेलेल्या चांगुणेला–आवाच्या आईला–उष्टे अन्न, प्लेगचे उंदीर पडलेला भात खाणे वाईट ही कल्पनाच शिवत नाही; पोटासाठी स्त्रीत्वाचा विक्रय करणे भाग पडते. पण सुसंस्कृत जगाची ओळख झालेल्या आवाला त्या परिस्थितीची घृणा येते, आईवडिलांची लाज वाटते, अन्यायाची चीड येते. जीवनविषयक सामान्य सिद्धांत तेथे आवाच्या चित्रातून विशेषरूपास आला आणि भिन्न जीवनाचे थोडथोडया छटेने बनलेले प्रतिनिधि (types) व त्यांच्या संघर्षातून निर्माण झालेली प्रसंगमालिका यातून मालतीबाईंनी परिस्थिति साकार केली. ध्येयवृत्ति व संस्कृति यांचा परिस्थितीविरुद्ध चाललेला झगडा हा अव्यक्त तात्त्विक संघर्षच तेथे मूर्त झाला. विधवांची करुणास्पद अवस्था दाखवण्यासाठी, सामाजिक अन्यायास वाचा फोडण्यासाठी हरिभाऊंनी 'यमुना' उभी केली. त्या काळातील प्रत्येक विधवेचे दुःख एकटया यमुनेच्या शब्दाशब्दातून पाझरले. 'शंकरमामंजी'च्या रुपाने रूढीच साकार केली. देवलांची 'शारदा', स्टोवेकचा 'अंकल टॉम', इब्सेनची 'नोरा', या साऱ्या शब्दमूर्ति म्हणजे विशेषरुपास आलेले सामान्यसिद्धांतच आहेत.

शास्त्रीय वाङमयाचा प्रवास बरोबर याविरुद्ध म्हणजे विशेषाकडून सामान्याकडे जातो. शास्त्रात अनुभूति घडत नाही. कारण शास्त्राचे आवाहनच बुद्धीला असते. तर्काला पटतील अशी अनेक उदाहरणे देऊन, त्या पुराव्यानिशी सामान्य सिद्धांत मांडावा लागतो. हजारो रोगी तपासून, कारण व परिणाम यांची प्रत्येक बाबतीत कसून छाननी केल्यावरच अमुक रोगाचे लक्षण अमुकच असे पुराव्यानिशी वैद्यकशास्त्र सांगते. अर्थशास्त्र, विज्ञानशास्त्र यातील सिद्धांतहि उदाहरणांनीच पटवावे लागतात. तर्काने मत सिद्ध करावे लागत असल्याने शास्त्रात संख्येला महत्व असते. अनेक उदाहरणे द्यावीत तेव्हां सिद्धांत बुद्धीस पटतो. संस्कृत 'ऋ' मराठीत येताना 'अ, इ, ऊ' अशा रूपांनी येतो हे मराठीतील शेकडो शब्दांची उदाहरणे देऊन भाषाशास्त्रास सिद्ध करावे लागले. एका उदाहरणाने शास्त्राचे नियम सिद्ध होत नाहीत तर एकच उदाहरण हा शास्त्रात अपवाद गणला जातो. कितीहि प्रभावी असली तरी एका घटनेवरून शास्त्रात मत मानले जात नाही कारण त्याचे आवाहन बुद्धीला असते, सत्यान्वेषण हे त्याचे उद्दिष्ट असते आणि तर्क व प्रयोग यांच्या सहाय्याने त्या विषयातील सत्य शास्त्र बुद्धीला पटवून देत असते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण जेथे शास्त्राची गति कुंठित होते, बुद्धि प्रेरणा देण्यास असमर्थ ठरते तेथे ललितकलेचे साम्राज्य सुरु होते. ललितवाङ्मयाचे आवाहन भावनेला असते. मानव हा विचारापेक्षा विकारांना जास्त वश असतो आणि त्यामुळेच कोणताहि तात्त्विक प्रश्न त्याला पटवून द्यायचा असेल तर केवळ बुद्धीस आवाहन करून भागत नाही; त्याच्या अंतःकरणाला आळवावे लागते. अंतःकरणाला गोष्ट पटवायची म्हणजे मग कलेचीच कास धरावी लागते. तेव्हा मनोरंजनाच्याच दृष्टीने नव्हे तर तत्त्वप्रतिपादनाच्या दृष्टीनेहि रस व कला यांना अत्यंत महत्त्व आहे. निर्गुण, निराकार, अव्यक्तावर मन केंद्रित करण्यापेक्षा सगुण, साकार, व्यक्तीवर मन केंद्रित करणे सोपे. अमूर्त कल्पनेस व्यक्तींच्या विकारविचाराने, घडामोडीने, कथेने मूर्त रूप दिले की ते अंतःकरणात यथार्थ प्रतिबिंबित होते. म्हणूनच हिटलरच्या वंशश्रेष्ठतेच्या कल्पनेमुळे झालेले अनर्थ ज्यूंचे हत्याकांड एलिस बॉटमने मूर्त केले ते एका ज्यू प्रोफेसरांच्या व त्यांच्या जर्मन–ज्यू मिश्र कुटुंबाच्या कथेने !– (Mortal Storm). आयुष्यांतील जबाबदारी विसरून वागणाऱ्यांचा 'उद्यांचा संसार' अत्र्यांनी मूर्त केला तो विश्राम–करुणेच्या विस्कळीत घरात; दुर्दैवाची पराक्रमावरची कुरघोडी कुसुमाग्रजांनी साकार केली ती कर्णाच्या करुण कहाणीत, 'कौंतेयात'! शेकडो पुराव्यांची, हजारो उदाहरणांची तेथे गरज नाही, संख्येस महत्त्व नाही. "There you lose the breadth, where you gain in intensity." उत्कटत्वाने रंगवलेली एकच सजीव भावकथा, जिवंत व्यक्तिरेखा असंख्य हृदयांच्या तारा छेडण्यास समर्थ आहे. लहानपणापासून वाढवलेली कन्या सासरी जाताना वत्सल पित्यास होणारे दुःख हे जगात ठायीठायी आढळते. पण आंकडेवारीने, संख्येने ते कळणार नाही. कालिदासाचा एकच कण्व आणि एकच शकुंतला ती अपार व्यथा व्यक्त करण्यास पुरेशी आहेत.

मात्र सामान्याकडून विशेषाकडे, अनेकाकडून एकाकडे ललितकला जात असली तरी तिचे व्यापक अधिष्ठान सुटता कामा नये. "Contemplating Universal in Particular is the essence of Poetry; still it must retain the character of Universal" कोणतीहि स्त्री रंगवली तरी स्थलकालनिरपेक्ष असे तिचे शाश्वत भाव, तिचे स्त्रीत्व, प्रत्येक स्त्रीविशेषातून, प्रकट झाले पाहिजे. 'Escapade in Japan' या चित्रपटात दोन लहान मुले पोलिसांच्या काल्पनिक भयाने पळून जातात, एकाची आई असते बड्या अमेरिकन परराष्ट्रमंत्र्याची पत्नी, नि दुसऱ्याची आई असते एका सामान्य जपानी कोळ्याची बायको. पण या दोघींच्याहि वित्तात 'बाळ हरवला' या जाणीवेने जो कोलाहल उठतो तो निश्चयाने एकच ! पुत्रविरहाच्या एकाच संकटाने विव्हल झालेल्या त्या दोन माता न बोलता एकमेकींचे हात हातात घेतात, केवळ नजरेने परस्परांचे सांत्वन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करु पहातात, नि पुन्हा व्याकुळ होतात तेव्हां त्या दोन विलक्षण भिन्न स्त्रियांमधील सारे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, भाषिक अंतर कोठल्याकोठे विरून जाते आणि उरते फक्त कारुण्यमयी वत्सल माता ! विलक्षण भिन्न व्यक्तिविशेष दाखवूनहि, त्यांचे व्यापक अधिष्ठान, सर्व स्त्रियांस समान असा वत्सलरस, इतक्या उत्कटत्वाने, इतक्या कौशल्याने मूर्त केलेला इतरत्र क्वचितच आढळेल. अत्यंत हीन व व्यभिचारी चित्र रंगवूनहि शेक्सपिअरने हॅम्लेटच्या आईचा वात्सल्याचा हक्क हिरावून घेतला नाही. ऑफिलियाच्या मृतदेहावर फुले पसरताना तिच्यातील स्त्री म्हणते, "हॅम्लेटशी, माझ्या बाळाशी हिचे लग्न झाले असते तर अशाच फुलांनी मी त्याची पुष्पशय्या रचली असती; पण आता हे नशिबाला आले !"

असा सामान्याचा धागा विशेषाच्या विकारविचारातून अनुस्यूत केला नाही, व्यक्तीचे व्यापक अधिष्ठान सुटले तर कलेची अपरिमित हानी होते. लेखक व्यक्ति विसरून वर्गाची भाषा तिच्या तोंडी घालतो. पण "Out of class, art declasses" हे व्यवधान राखावयास हवे. सीतेने स्वतःच्या दुःखाने ऊर फाटून हुंदके दिले आणि अजून जगात त्याचे पडसाद उमटत आहेत; पण "आम्हा स्त्रियांची दुःखें......" अशी वर्गाची भाषा ज्या लेखकांनी दुःखी स्त्रियांच्या तोंडी घातली, त्यांच्या शब्दाबरोबरच त्यांचे कलेतील स्थानहि लयाला गेले. गडकऱ्यांच्या नाटकात अनेकदा सुधाकर किंवा त्यासारखे इतर नायक पहिल्या दोन वाक्यातच लपतात आणि त्यांच्या ऐवजी गडकरी व्याख्यान देऊ लागतात. त्यांच्याप्रमाणेच खांडेकरांच्या लेखनात राणी व दासी, पोरं व थोरं एकाच सुरात बोलतात. 'वळी' कादंबरीत त्या त्या व्यक्तीला पेलतील असे विचार व भाषा वापरणे, रिपन्, डगन्, राई इ. गौण व्यक्तींच्याहि मुखात घातल्याने ते चित्र वास्तव व सजीव वाटते. फडक्यांच्या 'दौलत', 'जादूगार' या कादम्बऱ्यात हा कलाविकास इतका रम्य आहे की "तत्र सौरभ निर्माणे चतुरः चतुराननः।" असेच म्हणावेसे वाटते.

मानवाच्या विकारातून तत्त्व मूर्तिमंत करणे, सामान्य विशेषरुपास आणणे 'दुजी सृष्टी' उभारणे ही कलावंताची किमया आहे.

"Imagination bodies forth
The forms of things unknown
And Poet's pen turns them to Shape
And gives to airy nothing—
A local habitation and a name !"

कलेची जादूची कांडी अमूर्तावर फिरली की तत्त्व मूर्तिमंत होते आणि सामान्य विशेषरुपास येते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शाहिरी वाङ्‌मय
(एक चर्चा)

(प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. श्री. मा. कुलकर्णी व प्रा. भा. श्री. परांजपे यांच्यात झालेली ही चर्चा नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने येथे देत आहोत.) —संपादक

प्रा. कुलकर्णी—नमस्कार प्रा. पंडित.

प्रा. पंडित—नमस्कार कुलकर्णी. प्रा. परांजपेहि आलेले दिसतात. नमस्कार प्रा. परांजपे.

प्रा. परांजपे—नमस्कार.

प्रा. पंडित—मराठीतील शाहिरी वाङ्‌मयासंबंधी आज आपणाला चर्चा करावयाची आहे. काय कुलकर्णी ?

प्रा. कुलकर्णी—विचार चांगला आहे. म्हणजे चर्चा करावी ह्या. कारण शाहिरी वाङ्‌मयाबद्दल आज घटकेला जे विचार मांडले जात आहेत ते बरेचसे परस्पर विरुद्ध आणि सामान्य वाचकाला कांहीसे गोंधळात टाकणारे आहेत तेव्हां शाहिरी वाङ्‌मयातील हा गोंधळ नाहीसा होण्याच्या दृष्टीने अशी चर्चा उपयुक्त होईल. काय परांजपे तुम्हांला काय वाटतं ?

प्रा. परांजपे—विचारांचा गोंधळ सध्या शाहिरी वाङ्‌मयात दिसतो म्हणून जे तुम्ही म्हणालात ते खरं आहे. कुणी रोमँटिक टीकाकार शाहिरांना स्वच्छद-वादी मानतो, तर कुणी त्यांच्या कवनात इतिहासाचे अंश आढळतात म्हणून त्यांच्यावर खूप दिसतो आणि कुणी तर गाथा सप्तशती प्रमाणे लोकजीवनाचा उघडा शृंगार वर्णिल्याबद्दल त्यांना लोककवि म्हणून सर्टिफिकिट देऊन मोकळा होतो.

प्रा. पंडित—पण परांजपे, अलीकडे आणखी एक नवा पंथ निघाला आहे तो तुम्ही लक्षात घेतलेला दिसत नाही.

प्रा. परांजपे—तो कोणता ?

प्रा. पंडित—अहो, शाहिरांच्या कवनातून आध्यात्मिक अर्थ दाखवून त्यांना संत कवींच्या परंपरेत बसवणारा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. कुलकर्णी—म्हणजे एकंदरीत 'स्वच्छंदवादी कवि' 'भेदिक कवि' 'लोक कवि' आणि 'इतिहास रंगवणारे कवि' अशा चार दृष्टिकोनातून आजकाल शाहिरी काव्याचे मूल्यमापन केले जात आहे. पण हे एका दृष्टीने स्वाभाविकच नाही का? 'भिन्नरूचिर्हि' लोकः.....

प्रा. परांजपे—पण या भिन्न भिन्न अभिरूचीमुळे शाहिरी काव्याच्या रसस्वादालाच बाधा येत असली तर ती परिस्थिति मोठीशी हितकारक ठरणार नाही हे खरं ना?

प्रा. पंडित—अगदी खरं पण यासाठी पहिल्या प्रथम एक गोष्ट करायला हवी आणि ती म्हणजे शाहिरी काव्याची वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहणी करणे ही होय.

प्रा. कुलकर्णी—बरोबर. त्यासाठी या काव्याचा उगम प्रथम शोधायला हवा. पोवाडा हा जो शाहिरी वाङमयाचा एक प्रकार तो अधिक जुना असावा असे वाटते ज्ञानेश्वरीत 'पवाडा' हा शब्द अनेक वेळा आलेला आहे. तो विस्तार, महत्व, वर्णन, पराक्रम, कीर्ति अशा भिन्न भिन्न अर्थांनी वापरलेला दिसतो. पैकी वर्णन, पराक्रम व कीर्ति हे अर्थ आजच्या पोवाड्याच्या अर्थामध्ये संमिश्र स्वरूपात आढळतील.

राजे लोकांच्या पदरी भाट असण्याची पद्धति फार जुनी आहे.

प्रा. पंडित—तुमचे म्हणणे बरोबर आहे. भाटाप्रमाणेच गोंधळीहि असत. पण गोंधळी, भाट व शाहीर हे तिघेहि पद्यरचना करीत असले व त्यांचा राजेरजवाड्यांशी संबंध असला तरी त्यांच्या भूमिकात व साहित्यात अंतर आहे. गोंधळ्याची भूमिका ही एखाद्या कुलोपाध्याप्रमाणे असते. त्यांचा संबंध त्याच्या आश्रयदात्यांच्या कुलदैवताशी असतो. त्यांच्याकडील मंगलकार्यात समारंभात अगर उत्सवात तो कुलदैवतांना आवाहन करतो व गोंधळ घालतो.

प्रा. परांजपे—शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत अगिनदास व तुलसीराम हे गोंधळी होऊन गेले.

प्रा. पंडित—आणि भाट जो असतो तो आपल्या आश्रयदात्याच्या पराक्रमाचे पोवाडे गात असतो. भूषण हा शिवाजी महाराजांच्या पदरी भाट होता.

प्रा. कुलकर्णी—आणि कवि कलश याला संभाजी महाराजांचा आश्रय होता.

प्रा. पंडित—हो. आता राहिले शाहीर. शाहीर हा शब्द 'शायर' या मुसलमानी शब्दापासून आला आहे.

प्रा. कुलकर्णी—पण 'शायर' म्हणजे 'कवि'च. आणि शाहीरांनी स्वतःला कवि म्हणवूनहि घेतलं आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. परांजपे—ते खरं पण या शाहिरी काव्याच्या उगमाचा विचार करताना मला नेहमी प्रश्न पडतो तो हा की शाहीर शब्द 'कवि' या अर्थानेच मराठीत रूढ झाला की कोणता नवा अर्थ सुचविण्यासाठी तो मराठीत आला? कवि आणि 'शाहीर' हे शब्द एकाच अर्थाचे असतील तर मग संत कवींना वा पंडित कवींना आपण शाहीर का म्हणत नाही? तेव्हां मला वाटतं शाहीर हा शब्द निव्वळ 'कवि' एवढ्याच अर्थाचा द्योतक नसावा.

प्रा. पंडित—अहो त्यात निराळेपण असणं स्वाभाविकच आहे. शाहिरांची शाहिरी तमाशाच्या माध्यमाने प्रसार पावते. हा 'तमाशा' शब्दहि मुसलमानी आहे. आणि लावणी 'शब्द' मराठी असला व त्यातला शृंगारहि मराठीत असला तरी 'इष्काची बिमारी' 'नजरेचे खंजीर' 'गिर्रेबाज कबुतराची चाल', 'दिलाचे लचके तोडणे', मरणावाचून मारून टाकणे, खास अदा दाखवून ठार करणे . संकेत मुसलमानी आहेत. इतकेच नव्हे तर तमाशातील 'नाच्या पोऱ्या' हा मुसलमानी साकीची सुधारलेली किंवा विघडलेली आवृत्ति म्हणता येइल. तेव्हां 'शाहीर' व 'शाहिरी' वाङ्मय याला वेगळा अर्थ आल्यास नवल काय?

प्रा. परांजपे—म्हणूनच मला म्हणायचं आहे की शाहीर म्हणजे नुसता कवि नव्हे तर भाट किंवा राजाश्रित कवि. 'राधा माधवविलास चंपू' या आपल्या ग्रंथात जयराम पिंडचे याने शाहिराचा जो उल्लेख केला आहे तेथे हाच अर्थ निष्पन्न होतो. त्या ठिकाणी असे म्हटले आहे की एक कामिनी शाहिराला 'शाहराजाला' आपल्या घरी घेऊन येण्यासाठी दौत्यकर्म करायला सांगत आहे. शाहाजी राजाच्या दरबारात असलेल्या कवीलाच ती शाहीर असं म्हणते हे उघड आहे.

प्रा. कुलकर्णी—ते कांही का असेना, 'शाहीर' हा शब्द मराठीत लौकिक कवने करणारा कवि वा राजाश्रित कवि अशा अर्थाने रूढ झालेला दिसतो. ते जाऊ द्या. आपण या वाङ्मयाच्या उगमाचा बराच विचार केला. काळाच्या व परंपरेच्या दृष्टीनेहि विचार व्हायला हवा.

प्रा. पंडित—अहो काळाचा विचार सरळ आहे. मराठी शाहीरांचा तुर्रा रामजोशी हा इ. स. १७५७ च्या आसपास जन्मास आला व इ. स. १८१० मध्ये वारला. या मधल्या काळातच अनंतफंदी, होनाजीबाळा, सगनभाऊ व प्रभाकर हे नामवंत शाहीर उदयास आले. प्रभाकर व परशराम हे तर पेशवाई नंतर इंग्रजी राजवटीत अनुक्रमे १८४३ व १८४८ पर्यंत विद्यमान होते. तेव्हां हाच या वाङ्मयाचा कालखंड आहे. आता ह्याच काळात शाहिरी वाङ्मयाचा उदोउदो का झाला याचा विचार आवश्यक आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. कुलकर्णी––पण पंडितसाहेब या कालखंडात आपण पोवाडेकार शाही-रांचा समावेश केलेला दिसत नाही. पोवाडे जमेला धरले तर आपणाला शिवकालापर्यंत मागे जावे लागेल. आपण म्हणता तो काळ लावणी वाङमयाच्या दृष्टीने मात्र बरोबर आहे. लावणी व ती ज्यात म्हटली जाई तो 'तमाशा' हे प्रकार मात्र पेशवाईतले खरे. एकनाथादिकांच्या भारुडात अनेक प्रकारांवर रुपके आहेत पण तमाशावर नाही. रामदासांच्या काव्यात तमाशा शब्द आहे पण तो 'गम्मत' 'मौज' 'खेळ' या अर्थी आहे. तेव्हां तमाशाचे फड पेशवाईत उभे राहिले –तेहि उत्तर पेशवाईत.

प्रा. परांजपे––ते असू द्या. पण पंडितसाहेब आपण ऐतिहासिक विचार आवश्यक आहे म्हणालात तर आपल्या मते विशिष्ट काळातच हे वाङमय पुढे येण्याचं कोणतं ऐतिहासिक कारण आहे?

प्रा. पंडित—इ. स. १७६१ मध्ये पानपत होऊन गेल्यावर मराठ्यांनी पुन्हा मोठी अशी लढाई केली नाही. 'खडर्याची लढाई' ही पानपतच्या तुलनेत एक लहानशी चकमक होती. हृद्यापूत्रों उत्तरेकडे साम्राज्य स्थापन करण्यासाठी मराठ्यांनी आपले लष्कर खूपच वाढविले होते. इ. स. १७०७ मध्ये औरंगाबादेस औरंगजेब मरण पावल्यानंतर दिल्लीच्या जनानखान्यातून शाहू महाराजांची सुटका झाली. त्यांनी आपल्या आगमनाबरोबर उत्तरेकडील रंगढंग महाराष्ट्रात आणले. बाजीराव, नानासाहेब व राघोबादादा ही सारी मंडळी पराक्रमी होती व रंगेलहि होती. या पराक्रमी पुरुषांबरोबर त्यांचा पराक्रम गेला पण रंगेलपणा मात्र मागे रेंगाळत राहिला. सवाई माधवरावाच्या राजवटीत महादजी शिंद्यांनी पुण्यात रंगपंचमी साजरी केली. यावेळेपासून शाहिरांच्या शाहिरीला मोठा रंग आला आणि शेवटल्या रावबाजीच्या राजवटीत त्यांच्या रंगाबरोबर तोहि उधळला गेला.

प्रा. परांजपे—आपली मीमांसा चांगली आहे व खरीहि आहे. मघा प्रा. कुलकर्णी यांनी परंपरेचा उल्लेख केला. त्याबाबतीत मला असं म्हणायचं आहे की शाहिरी वाङमयाचा संबंध संतवाङमयाशीहि उगमाच्या दृष्टीने लावता येईल. शाहिरी वाङमयातील गणगौळणींचा प्रकार हा संत परंपरेतूनच आला आहे असं म्हणायला हरकत नाही. 'डोळे मोडीत राधा चाले' हे एकनाथांनी केलेलं राधेचं वर्णन आणि 'रोख नको मारं नयनाचें' हे शाहिरांच्या नायिकेचं वर्णन या दृष्टीने तुलनीय ठरेल. तसेच ज्ञानेश्वरांची शकुन मागणारी विरहिणी व होनाजीची 'आज कांग काग बोलतो घराबरी' अशी पृच्छा करणारी विरहिणी यातहि किती साम्य आहे नाही ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. कुलकर्णी--अहो पण त्या विरहिण्याचे झुरण्याचे विषय वेगळे आहेत. बाकी संतांच्या देवासाठी झुरणाऱ्या विरहिणींपेक्षा शाहिरांची प्रियकरासाठी झुरणारी विरहिणी सामान्य श्रोत्यांना विशेष मोहिनी घालीत असावी.

प्रा. पंडित--अहो ते बरोबर आहे. पुन्हा लावण्यांचे श्रोते हे शिपाईगडी असत. रंगेल रावबाजी, त्याचे खुशालती प्रजाजन आणि रिकामे शिपाईप्यादे यांना तमाशे, ताशे व जलसे यांच्याशिवाय दुसरा उद्योग नव्हता. तशात त्यांना आपले रंगेल जीवन त्यात चितारलेले दिसत होते. मग ते त्यांना कसं आवडणार नाही ?

प्रा. परांजपे--हे तर खरंच पण त्यात रचनेचाहि भाग असावा. नाथांच्या गौळणीपेक्षा या शाहिरी कवनाची रचना विशेष सफाईदार आहे आणि हेहि त्यांच्या आकर्षणाचे कारण आहे.

प्रा. कुलकर्णी--अहो पण ही सफाई सर्वत्र शाहिरी रचनेत नाही. ती हळूहळू विकास पावत गेलेली दिसते. आणि ओबडधोबड व गद्यसदृश रचना असूनहि आरंभीचे पोवाडे श्रोत्यांना भारून टाकीत असलेच पाहिजेत हे खरं ना ?

प्रा पंडित--अहो पुष्कळसे शाहीर हे अशिक्षित असल्यामुळे त्यात 'ध्वनि', 'औचित्य', सद्भिरुचि' 'संयम' इ. काव्यगुणाचे दर्शनहि फारसे होत नाही. त्यांचे सौंदर्य त्यांच्या उच्छृंखलपणात, उद्दामपणात व उत्तानपणात आहे.

प्रा. परांजपे--रचनेच्या दृष्टीने पाहिलं तर शाहिरी रचना ही संतपरंपरे-पेक्षा हरिदासी आणि पंडिती रचनेला जास्त जवळची आहे. या हरिदासी कवनांचा तोंडवळा कधी कधी शाहिरी कवनांशी इतका जुळतो की यात हरिदासी कवन कोणतं आणि शाहिरी कवन कोणतं याचा भ्रम पडावा. आनंदतनयाची झगड्याची पदं, अमृतरायाचं स्त्रीसौंदर्य वर्णन, मध्वमुनींची मुरली आणि राधा-कृष्णसंवाद ही रचना रामजोशी व होनाजीबाळा यांच्या रचनेशी बरीच जुळती आहे.

प्रा. कुलकर्णी--मला वाटतं संत आणि पंडित परंपरेप्रमाणेच याबाबतीत लोकगीतांची परंपराहि लक्षात घ्यायला हवी. आरत्या, ओव्या, पोवाडे, भारुडे, निरनिराळ्या प्रसंगांची गाणी अशा लोकगीतात लावणी हा विशेष आकर्षक प्रकार होय. या लोकगीतात स्वर व लय ही दोन्ही संगीतमूल्ये ओबडधोबड स्वरुपात का होईना पण असतात. लयीमुळे श्रोते धुंद होऊ शकतात. लावणी हा प्रकार पुढे दीर्घ झाला आणि त्याने संगीतात बरीच प्रगति केली. अनेक लावण्यांची बांधणी चातुर्यपूर्ण असून तिच्यात नाद, प्रास, खटका इ. चा अंतर्भाव झाल्याने ती विशेष आकर्षक बनली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. परांजपे--लोकगीतातून या रचनेचा उगम असेल आणि शाहिरांची सुरवातीची रचना कदाचित चावडीत झाली असेल. पण कांही रचना दरबारात व दरबारासाठी झालेली आहे हे विसरून कसे चालेल ?

प्रा. पंडित--आपलं म्हणणं थोडंसं बरोबर आहे. अज्ञानदासाने शिवाजी-राजावर रचनेला पोवाडा हा दरबारात गाइला गेला हे प्रसिद्धच आहे.

प्रा. कुलकर्णी--ते ठीक आहे. पण पोवाड्याचा हेतु निदान शिवकालात तरी लोकांना स्फूर्ति देणं हाच होता. गत इतिहासाचे स्मरण देऊन लोकांच्या मनात स्वदेशाभिमान जागृत करण्याचे व त्यांना स्वातंत्र्यप्रवण करण्याचे महत्वाचे कार्य या पोवाड्यांच्याकडून त्या काळी झाले आहे. गोंधळ हा धार्मिक प्रकार खरा पण शिवशाहीत त्याला राजकीय व राष्ट्रीय स्वरुप आलं. लो. टिळकांनी पुढे दोन तीन शतकानंतर गणेशोत्सवासारख्या धार्मिक उत्सवाचा उपयोग राजकीय व राष्ट्रीय जागृतीसाठी जसा केला तसाच हा प्रकार होता.

प्रा. पंडित--कुलकर्णी, हा तुमचा मुद्दा चांगला आहे. मला तो ग्राह्य वाटतो. पण पेशवाईत मात्र हा प्रकार राहिला नाही. एकतर पोवाडेच फार कमी रचले गेले. सारा भर लावणीवर होता.

प्रा. परांजपे--लावण्यांच्या बाबतीतहि शाहिरांची भूमिका व उद्देश वेगवेगळे होते. केवळ रंजन हाच सर्वांचा हेतु होता असं म्हणता येणार नाही. त्यातहि टीका आहे, उपदेश आहे. रामजोशी, होनाजी यांच्या कवनात अशा लावण्या निश्चितच सापडतील. कृष्णलीलेवरील आपल्या लावण्यात रामजोशीची गवळण म्हणते, 'पुरुषाएवढा पुरुष असून काय खेळशी पोरटा'– रावबाजींच्या रास-क्रीडेसंबंधी ही रामजोशांची टीका आहे असं नाही का आपणाला वाटत ? परशरामानेहि 'कोणे शास्त्री वर्णिल्या कीर्ति जारजारणीच्या' असा अधिक्षेप केला आहे तो तत्कालीन वाङमयात परकीया नायिकांची जो अफाट स्तुति चालली होती आणि रावबाजींच्या वाड्यात जी रासन्हाणी चालली होती त्याला अनुलक्षूनच नाही का ?

प्रा. पंडित--पण काहो, परांजपे–याच परशरामाने आणि रामजोशीने बाजीरावावर स्तुतिपर कवनेहि लिहिलेली आहेत ना ?

प्रा. परांजपे--तुमचा टोला आला माझ्या लक्षात. पण हे पहा पंडित साहेब, भाटगिरीची कवने रामजोशांनी केली असली तरी तो त्यांचा धंदा होता असे फार तर म्हणता येईल त्याचं अंतरंग मात्र त्या भाटगिरीत नसून या दुसऱ्या प्रकारच्या कवनात आहे. तुमचं काय मत आहे कुलकर्णी ?

प्रा. कुलकर्णी--कवीने अनेक कवने केली असली तरी त्याच्या आत्म्याची तळमळ वा अनुभूति एखाद्याच कवनात आढळेल हे तुमचं म्हणणं ग्राह्य आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यावरूनच एक विचार सुचतो तो असा की कोणत्याहि कवीच्या कवनाचे यशापयश किंवा श्रेष्ठ–कनिष्ठत्व हे त्याच्या अशा अल्पसंख्य पण बहुगुणी कवनावरूनच ठरवायला हवं.

प्रा. परांजपे—बेशक ! शाहिरांच्या कवनांचा वस्तुनिष्ठ विचार याच भूमिकेतून व्हायला हवा. काय पंडितसाहेब बरोबर आहे ना !

प्रा. पंडित—बरोबर. मीहि असंच मानतो आणि म्हणूनच शाहिरांनी कांही विनोदी व कांही देवादिकांवरील लावण्या लिहिल्या असल्या तरी किंवा त्यांच्या कांही लावण्या भेदिक असल्या तरी त्यात त्यांच्या प्रतिभेचे दर्शन होत नाही. त्यांचं वैशिष्ट्य त्यांच्या बहिर्मुख व चोखंदळ दृष्टीने लिहिलेल्या कवनातच पहायला हवं.

प्रा. परांजपे—हे मात्र अगदी खरं ! शाहिरांचं खरं वैशिष्ट्य कशात असेल तर ते त्यांच्या लौकिक कवनात. मग ती खडर्याची लढाई असो, एखाद्या विरहिणीचा विलाप असो, भाऊसाहेबावद्दलचा शोक असो, तानाजीचे स्मरण असो, पत्नीचा निरोप असो किंवा एखाद्या सुलक्षणी स्त्रीचे वर्णन असो. त्यात लौकिक जीवन रंगविलेले असते. हाच या कवनाचा प्रमुख विशेष. या त्याच्या विशेषामुळे तत्कालीन श्रोतृवर्ग संत आणि पंडित परंपरेपेक्षा या कवनाकडे विशेष आकृष्ट झाला

प्रा. कुलकर्णी—याबाबतीत मला असं म्हणायचं आहे की या वाङमयाकडे आकृष्ट होणारा वर्ग निराळाच होता आणि समाजात त्याला फारशी प्रतिष्ठा नव्हती. लावणी वाङमयातलं जीवनचित्र जसं सर्व समाजाचं प्रातिनिधिक नव्हे तसा त्याचा रसिकवर्ग हाहि सर्व समाजाचं प्रतिनिधित्व करणारा नव्हे.

प्रा. पंडित—अहो पण अच्युतराव कोल्हटकरांनी 'हीच अस्सल मराठी कविता' असं म्हटलं त्याचं काय ?.

प्रा. कुलकर्णी—त्यातला 'च' फक्त मला मान्य नाही. संत काव्याची तसेच पंडिती काव्याची भूमिका निराळी होती, त्यांचे ध्येय निराळे होते, त्यांचे विषय निराळे होते आणि त्याला अनुसरून अशी त्यांची मांडणी निराळी होती. संतांनी संस्कृतातीलच तत्वज्ञान मराठीत आणले, अगर पंडितांनी संस्कृतातील आख्याने मराठीत आणली एवढ्याच एका कारणासाठी त्यांचे काव्य मराठी नव्हे हे म्हणणे स्थूल दृष्टीचे झाले. मराठीतल्याप्रमाणे संतकाव्य संस्कृतात नाही. संस्कृतात रसराज शृंगार होता तर मराठी संतकवींनी त्याच्या माथ्यावर शांत रसाला बसविले. पुढे पंडितकवींनीहि भक्तीचे अधिष्ठान सोडले नाही. आणि भक्ति–वाङमय निर्माण करुन मराठी संत व भक्तकवींनी भक्तीला निर्विवादपण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रसत्व प्राप्त करून दिले. त्यांनी वापरलेली ओवी, अभंग ही वृत्तेहि अस्सल मराठी होत.

प्रा. पंडित—तुमचे म्हणणे बरोबर आहे. पुन्हा शाहिरांनीहि जुने संकेत, जुनी उपमाने, व जुने विषयहि वापरलेले आहेतच. मात्र संस्कृत व मुसलमानी संकेतावरोबरच कांही शुद्ध मराठी संकेतहि शाहिरी वाङमयात आढळतात आणि त्या दृष्टीने ते अभ्यसनीय आहेत.

प्रा. परांजपे—अशा संकेतांची कांही उदाहरणे सांगा ना !

प्रा. पंडित—अहो, लावणीतील नायिका बहुधा गडणी किंवा सजणी असते. नायक बहुधा सजन, दिलाचा राजा, सखा किंवा पंचो प्यारा असतो. तो नायिकेला 'मैना,' आणि ती त्याला 'राघू' म्हणते. तिची कमर पोटात व हसू तिच्या ओठात असते.

प्रा. कुलकर्णी—पंडितसाहेब हा कमरेचा संकेत मात्र मुसलमानी आहे वरं का ? आपल्याकडे 'सिंहकटि' होती. पण ती होती. एक उर्दू कवि प्रश्न करतो की तिला कमरच नाही तर ती पायजामा कुठे बांधीत असेल ?

प्रा. पंडित—अहो हे आणखी कांही संकेत पहा. तिचे गाल निरशा दुधाच्या खव्यासारखे गोड व मुलायम असतात. तिच्या गळयात वीणेची तार असते, ती कधी चटकचांदणीप्रमाणे चटकदार वाटते कधी चमक विजलीप्रमाणे झटका देणारी वाटते, तिचा बांधा सुरु सारखा उंच व उभार असतो, आणि तिच्या चालण्यात मोराचा कुर्रा असतो. तिची साडी हिरवी असते चोळी हिरवी असते आणि हिरव्या हिरव्यागार आंबराईत तो स्वैर साळूसारखी हिंडत असते.

प्रा. कुलकर्णी—वा ! अगदी लावणीतली लावण्यवतीच उभी केलीत की !

प्रा. परांजपे—अहो, पंडित स्वतः उत्तम कवि आहेत ! पण ते असो. या लावणीवाङमयासंबंधीच्या एका अपसमजुतीचं निराकरण झालं पाहिजे.

प्रा. पंडित—ती कोणती ?

प्रा. परांजपे—'शाहिरी' म्हणजे 'पोवाडे' असं शिवकालातल्या श्रोत्यांना वाटत होतं. पेशवाई अखेर लावणी म्हणजे 'शाहिरी' असा संकेत रूढ झालेला दिसतो आणि त्यातहि 'शृंगारिक' म्हणजेच लावणी असं समीकरण होऊन बसलेलं दिसतं. मला वाटतं या समजुतीमुळेच शिष्ट समाज या वाङमयाकडे तुच्छतेच्या भावनेने पाहतो. खरं पाहिलं, तर लावणीचे विषय व प्रकार अनेक आहेत आणि निव्वळ अशिष्ट लावण्या फारच थोड्या आहेत तेव्हां त्यांच्यावरुनच शाहिरांच्या अभिरुचिबद्दल मत बनविणे मला बरोबर वाटत नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. कुलकर्णी—तुमचे हे म्हणणे सहानुभूतीचे व न्याय्यहि आहे हे खरे. परंतु शाहीर, त्यांचं लावणीवाङ्मय, त्यावर तमाशे करणारे तमाशेवाले व ते पाहणारे तमासगीर यांना समाजात मानाचं स्थान कधींच प्राप्त झालं नाही हे ऐतिहासिक सत्य आहे. आणि त्याला कांही कारणं निश्चितच आहेत. समाजाचा निर्णय कधी चुकत नाही.

प्रा. पंडित—मग तुम्हांला याचं कारण काय वाटतं ?

प्रा. कुलकर्णी—थोडक्यात एक मीमांसा मी आपल्यासमोर मांडतो. पटते का पहा. भारतीय संस्कृतीने कांही जीवनादर्श व जीवनमूल्ये ठरविली आहेत. एकंदर भारतवर्षात व विशेषतः महाराष्ट्रात साधुसंतांनी त्या आदर्शांचा व मूल्यांचा समाजाच्या खालच्या थरापर्यंत प्रसार केला. विवेक वैराग्य, ज्ञान-भक्ति यांना या शिकवणूकीत प्राधान्य आहे. अर्थ व काम यांना स्थान असले तरी त्यांना धर्माचे अधिष्ठान हवे. आणि अंतिम ध्येय तर मोक्ष ठरले. शाहिरी वाङमयाच्या अगोदरपासून समाजाच्या मनावर या तत्वज्ञानाचा व शिकवणूकीचा पगडा बसलेला असल्यामुळे लौकिक शृंगाराला प्राधान्य देणाऱ्या शाहिरीवाङमयाला प्रतिष्ठित व मानाचे स्थान मिळाले नाही. आणि झाले ते योग्यच झाले असे मला वाटते.

प्रा. पंडित—पण शाहिरांनीहि अध्यात्मपर रचना केली आहे त्याचं काय ? काय परांजपे तुम्हाला या भेदिक कवनांबद्दल काय म्हणायचं आहे.

प्रा. परांजपे—आपण म्हणतां तशी कवने शाहिरी वाङमयात आढळतात यात शंका नाही. उदाहरणार्थ शिदू रावळाची कामसेनेची लावणीच पहा ना. त्याचा शेवट पाहिला म्हणजे शृंगाराच्या माथा पाय ठेवणारा शांतरस लावणीतहि प्रगट झाला आहे असे आपल्याला वाटल्याशिवाय राहणार नाही. परशरामाच्याहि ऱ्याच लावण्या अध्यात्मिक स्वरुपाच्या आहेत आणि त्या तुकाराममहाराजांच्या विराण्याची आठवण करुन देतील अशी आशा आहे.

प्रा. कुलकर्णी—पण याचा अर्थ मी असा घेतो की संताच्या शिकवणीचा प्रभाव शाहिरांनाहि डावलता आला नाही. आणि आपली प्रतिष्ठा कशीबशी सांभाळण्यासाठी त्यांनाहि अध्यात्माकडे धाव घ्यावी लागली. पण हे अनुकरणात्मक अध्यात्म आहे, स्वानुभवाचे नव्हे. स्वानुभवाचं असतं तर समाजाने त्यांनाहि संत म्हणण्याला कमी केलं नसतं पण 'नव्हती ती ते संत करिता कवित्व' हे तुकोबाचं म्हणणं खरं आहे.

प्रा. पंडित—हो. मला वाटतं आपला वेळ संपला. एकंदरीने आपली आजची चर्चा चांगली झाली. तुम्ही दोघांनीहि नवे विचार मांडून चर्चेला चांगली चालना दिलीत याबद्दल मी तुम्हा दोघांचेहि अभिनन्दन करतो.

(पृष्ठ ३४ वर)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सम्पादकीय (पृष्ठ ४ वरून)

ही पारितोषिके निःपक्षपातीपणानं व केवळ साहित्यिक मूल्यावरच जर दिली गेली नाहीत तर साहित्याच्या क्षेत्रात मूल्यांचा गोंधळ झाल्याशिवाय राहणार नाही. अयोग्य स्पर्धा, गटबाजी, हेवेदावे, यांनी साहित्यक्षेत्रातील वातावरण दूषित होण्याचाहि संभव आहे. व म्हणून सरकारने पारितोषिकादिकांपेक्षा मौलिक साहित्य प्रकाशित करणे, ते कमी किमतीत उपलब्ध करून देणे, अन्य भाषातील श्रेष्ठ साहित्यकृतींचे अनुवाद करवून ते प्रसिद्ध करणे, जुने अप्रकाशित व दुर्मिळ साहित्य प्रकाशित करून उपलब्ध करून देणे, या सारख्या गोष्टींकडे आपले लक्ष व द्रव्याचा ओघ ही वळविली पाहिजेत.

साहित्यिकांना अनुभवाची विविध क्षेत्रे उपलब्ध असण्यावर साहित्यिकाची अनुभवसमृद्धि व त्या अनुभवसमृद्धीवर त्याच्या साहित्याचा दर्जा अवलंबून असतो. पारतंत्र्यामुळे आपल्या देशातील साहित्यिकांना अनेक क्षेत्रे बंदच होती. त्याचा परिणाम पाश्चात्य देशातील साहित्यात व आपल्या देशातील साहित्यात जे अंतर आहे त्यावरून लक्षात येतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या दृष्टीने सरकारने प्रयत्न करायला पाहिजेत. साहित्यिकांना देशभर फुकट प्रवास करता यावा अशी व्यवस्था सरकारने करावी ही प्रा. फडक्यांची सूचना विचारार्ह आहे. अर्थात ती अमलात आणण्याच्या मार्गात काही कारभार-विषयक व व्यावहारिक अडचणी असू शकतात. शिवाय एकंदर समाजाची नैतिक पातळी विचारात घेता अशा सवलतींचा अनेक रीतींनी दुरुपयोग होण्याचा संभवहि दुर्लक्षिता येत नाही.

साहित्याच्या प्रसाराच्या दृष्टीने साहित्यसंस्थांना योग्य ते आर्थिक सहाय सरकारने देणे जरूर आहे. साहित्यसंस्थांच्या मुखपत्रांना, ती त्रैमासिके असली तरी पोस्टाची सवलत देणे, रेल्वे प्रमाणेच पोस्टानेहि पुस्तकांच्यासाठी पार्सलचे निम्मे दर करणे इ. गोष्टीहि सरकारांनी करण्यासारख्या असून त्या उपकारक ठरतील. मात्र या संबंधात साहित्य-संस्थांनीहि आपले कर्तव्य केले पाहिजे. साहित्याची निर्मिति, त्याची वाढ, त्याचा प्रसार या सर्व गोष्टीत साहित्यसंस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे व लोकांकडून आणि सरकारकडून या कार्यासाठी द्रव्य-सहाय मिळवून ते कार्य हिरीरीने केले पाहिजे.

साहित्यिकांनीहि स्वतःचा वाटा उचलला पाहिजे. नुसत्या आर्थिक सहायाने साहित्याच्या प्रसाराचा प्रश्न सुटणार नाही साहित्यिकांची निष्ठा, चिकाटी, तळमळ यांनीहि पुष्कळसे कार्य होण्यासारखे आहे.

प्रसारा इतकाच किंबहुना त्याहून अधिक महत्वाचा साहित्याच्या प्रतिष्ठेचा व प्रगतीचा प्रश्न आहे. किंबहुना साहित्याच्या प्रतिष्ठेवर त्याचा प्रसार अवलंबून आहे. या दोन प्रश्नांचाहि विचार होणे आवश्यक आहे. तो यथावकाश करू.

—श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डायरीतून अेक पान–

अंतरीच्या खुणा
जुळताना पाहिल्या. . .जळताना पाहिल्या !
किती शुभ्रपंखी पऱ्या स्वप्नातच राहिल्या !
सोनक्षणांचे स्पर्श झाले कळचाकळचांना

त्यांना फूलफुलवाया अवकाश विसरत गेला !
आठवते का रीत तुझ्या माझ्या प्रीतीची ?
आत आत पुकारती. .बाहेर बंध झुगारती !
असे कसे जीव तेव्हां नभात पांगले होते ?
निळचालाल घमन्यात तरी किती हेतु थकले होते !

कळून कवटाळेस अबोलीच्या कोषात. . .
मला छळले सगळे अर्थ दुवळचा भाषात
पाप पाहण्यात तरबेज असतात जगाचे डोळे
आपण कां ग कांहीच साधले नाही ?
–असे भोळे ?

आता नको विचारूस कधी कुणाला
अनिश्चिताची ओढ

हृदय विसरण्यातहि मी मानले गोडच गोड. . .
–मात्र विसरू नकोस

माझ्या अंत्यसंस्कार–समारंभाला
हंसतमुखी येण्याजाण्यासाठी. . .

माझ्या पुढच्या अंतः प्रवाही हेच होईल काठी
वळणे वळणे वळताना मी खरोखर भोवळलो
माझ्याच नेत्रदीपक प्रकाशात मी आता मावळलो !

मी आहे दुःखी. . .ही तुझी अेक चूक
मी आहे सुखी. . .तुझे गडे सगळेच चूक !!

–रवीन्द्र बोरगांवकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काय तुला द्यावे ?

तू दाता काय तुला द्यावे ?
ब्रम्हांड तुझ्या अुदरी मावे !

दिव्य तुझी कांचनमय नगरी
रत्नदीप झळकती मन्दिरी
मूर्तिमन्त दारिद्र्य मी परी
वद काय तुला मी अर्पावे ?

सदनी निर्धनतेची वसती
अुजळत तम मिणमिणते पणती
सघन परी आत्मधने चित्ती
ते चित्त तुझेच तुला ठावे

बलरामासम मला मानुनी
सुस्वागत केले निजसदनी
धन्य मला केलेस त्रिभुवनी
त्या तुला सांग काय वहावे ?

दयितेने दिधले तुजसाठी
पोहे असती माझ्यागाठी
गोड करून घ्यावे मजसाठी
देताना का न खजिल व्हावे ?

अनन्त हस्ते अनन्त देशी
दैन्य जगाचे विलया नेशी
सेवकास या तव चरणाशी
शेवटी विरामस्थल द्यावे

—माधव जामदार

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाना जोगांचे 'भारती'—

एक मनोविश्लेषणात्मक विवेचन

लेखक–प्रा. म. बा. कुंडले, एम्. ए., एम्. एड्.

श्री. नाना जोग हे नाट्यलेखक, नाट्यदिग्दर्शक, रंगमंदिराचे निर्माते इत्यादि अनेक नात्यांनी मराठी जनतेला परिचित आहेत परंतु त्यांचे नाटय-लेखन फारसे यशस्वी ठरले नाही. त्यांची नाटके प्रेक्षकांना तर रुचली नाहीतच परंतु टीकाकारांच्याहि फारशी पसंतीस उतरली नाहीत. साधारणतः साम्यवादी प्रचार, विचारजडता व तज्जन्य रुक्षता हे आक्षेप त्यांच्या नाटकावर घेतले जातात व या बुद्धिजड व प्रचारात्मक स्वरुपामुळेच ती लोकप्रिय होऊं शकली नाहीत असे मानले जाते. त्यांच्या नाटकावरील हे आक्षेप व्यक्तिशः मला पूर्ण. मान्य नाहीत. परंतु त्यात कांही प्रमाणात सत्यता आहे हे नाकारता येणार नाही-तरीहि हे आक्षेप मुख्यतः 'चित्रशाळा' व 'सोन्याचे देव' या दोन नाटकांना लागू पडतात; 'भारती' या नाटकाला नव्हे असे मला वाटते. 'भारती' हे उपरिनिर्दिष्ट दोषांपासून—साम्यवादी प्रचारापासून—अलिप्त आहे. माझ्या मते 'भारती' ही एक उत्कृष्ट, आशय व अभिव्यक्ति या दोन्ही दृष्टीनी केवळ नाविन्यपूर्णच नव्हे, तर अनन्यसाधारण अशी कलाकृति आहे. दारिद्र्यामुळे अनेक गुणसंपन्न कुमारिकांवर नाइलाजाने प्रौढ माणसांशी विवाह करण्याचा दुर्धर प्रसंग कसा ओढवतो व त्यामुळे त्यांच्या जीवनाची कशी विटंबना होते याचे अतिशय भेदक दर्शन जोगांनी या नाटकात घडविले आहे. हा समाजाच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. 'शारदे'पासून तो आजतागायत निरनिराळ्या दृष्टि-कोनातून या विषयावर नाटके लिहिली गेली. परंतु या विषयाची अत्यंत अभिनव व मानसशास्त्रीय स्वरूपात मांडणी करण्याचा श्री. जोग यांनी अतिशय उत्तम प्रयत्न केला आहे. यामुळे सामान्य माणसाला विषय आकलन होण्यास थोडा अवघड जातो हे खरे, व त्यामुळेच नाटकहि फारसे लोकप्रिय होऊ शकले नाही. हे स्वाभाविकच असले तरी सुबुद्ध, जाणत्या व मार्मिक प्रेक्षकांना मात्र त्यातील आशय व अभिव्यक्ति यांमधील वैशिष्ट्यपूर्ण नवता व महत्ता प्रतीत होण्यास वास्तविक प्रत्यवाय नसावा. नाटकातील आशय हा वैचारिक व मानस-शास्त्रीय स्वरुपाचा असला तरी भावनेच्या ओलाव्याने आर्द्र झालेला आहे. त्यामुळे रुक्षता कुठेहि आलेली नाही. 'भारती'चे व्यक्तिदर्शन जितके करुणरम्य तितकेच हृदयस्पर्शी झाले आहे. संपूर्ण नाटकभर अबोल असलेली ही व्यक्तिरेखा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विलक्षण बोलकी आहे. तिची होत असलेली विटंबना पाहून सहृदय प्रेक्षकांचे डोळे अनुकंपेने पाणावतात. वाचा फुटल्यानंतर तिच्या तोंडून बाहेर पडलेल्या शेवटच्या उद्गारात स्त्रियांच्या अगतिक परिस्थितीचे, लाजिरवाण्या परतंत्र जीवनाचे जे वर्णन ती करते ते यथार्थ तसेच अत्यंत विदारक आहे. बरे, विचारगर्भ असूनहि नाटकाची भाषा क्लिष्ट नाही. प्रासादिक-प्रसंगी काव्यमयहि आहे. भारतीच्या विकृतीची मीमांसा करणारे डॉक्टरांचे एकदोन परिच्छेद सोडले तर संवादहि सुटसुटीत आहेत. मधून मधून झाडलेले औपरोधिक परंतु वैशिष्टचपूर्ण ताशेरे संवादात विनोद व खुसखुशीतपणाची भर घालतात. नाटकातील दोन कविता व शेवटचे मुक्तछंदातील गद्यकाव्य ही लेखकाच्या काव्यप्रतिभेची साक्ष पटविवात. भरघोस आशयघनता, मोजकीच पात्रे, अनावश्यक पाल्हाळ यांचा पूर्ण अभाव, एकसंघ व नाटचपूर्ण रचनाशिल्प या सर्व गोष्टीमुळे 'भारती' ही माझ्या मते एक उत्कृष्ट कलाकृति ठरते. लेखकाची विचारसरणी कोणाला पटो अगर न पटो परंतु 'भारती' ही एक उत्तम कलाकृति आहे याबाबत तरी कोणाचे दुमत होऊ नये. पण भांडवलशाही, संपत्तिप्रधान समाजरचनेला बळी पडलेली एक तरुणी व त्यात प्रतिपादन केलेली सामाजिक क्रांतीची आवश्यकता एवढ्याच भांडवलावर 'साम्यवादी प्रचार' म्हणून हाकाटी पिटणाऱ्या व तिच्या इतर कलात्मक गुणांकडे दुर्लक्ष करून तिची हेटाळणी करणाऱ्या 'सांस्कृतिक' टीकाकारांना काय म्हणावे ?

परंतु या लेखात मला वाचकांचे लक्ष प्रामुख्याने वेधावयाचे आहे ते त्यातील वाङ्मयीन किंवा कलात्मक बाजूकडे नसून त्यातील मनोविश्लेपणात्मक स्वरुपाकडे ! 'भारती' ही प्रामुख्याने एक मनोविश्लेषणात्मक कृति आहे. ज्याला शास्त्रीय मनोविश्लेषण (psycho-analysis) म्हणतात त्या धर्तीचे मनोविश्लेषण कलात्मक पद्धतीने या नाटकात केले गेले आहे. मनोविकृति झालेली एक नायिका, तिच्या विकृतीची मानसोपचारकाकडून (Psychiatrist) केली जाणारी मीमांसा, विकृति निवारणासाठी उपयोजिलेली उपचारपद्धति, तिच्या मर्यादा व मूल्यमापन या सर्व गोष्टींचे कलेच्या व रंगभूमीच्या मर्यादा सांभाळून, दर्शन घडविण्याचा एक अत्यंत अभिनव असा प्रयत्न या नाटकात श्री. जोगांनी केला आहे. आज अनेक कलाकृतिमध्ये आढळते तसे या नाटकातील मनोविश्लेषण बांडगुळवजा नसून कथानकाशी त्याचा एकजीव झालेला आहे. तोच कथानकाचा मूळ गाभा आहे. इंग्रजीत 'Spell-Bound', 'Snakepit' इत्यादि जे नामवंत बोलपट झाले त्याच स्वरूपाची या नाटकाची एकंदर घाटणी आहे. अशा स्वरुपाचे नाटक मराठीत त्यापूर्वी तर लिहिले गेले नव्हतेच, परंतु अजूनहि कोणी लिहिल्याचे माझ्या वाचनात नाही. या दृष्टीने हे पहिले खरेखुरे मनोविश्लेपणात्मक नाटक आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणून त्यातील मनोविश्लेषणात्मक समस्येचे थोडेसे मानसशास्त्रीय विश्लेषण करण्याचा माझा इरादा आहे.

तत्पूर्वी नाटकाची कथावस्तू थोडक्यात मांडणे आवश्यक आहे. ती अशी:— नाटकात पात्रे एकंदर पाच. भारती, मार्तंडराव, कुमार, रसिकलाल व डॉक्टर विश्वंभर. भारती ही पंचविशीतील एक तरुणी— वडिलांच्या मृत्यूनंतर आई व पाठच्या चार वहिणी यांच्या संसाराचा गाडा नोकरी करून ओढत असते. ती बी.ए. झाली असून गायनकौशल्य, गृहदक्षता इत्यादि अनेक गुणांनी संपन्न असते. परंतु घरातील अठराविश्वे दारिद्र्य व कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे तिला स्वतःच्या इच्छा वासनांना आवर घालावा लागतो. मार्तंडराव हे पन्नाशी उलटलेले—विषयलोलूप वृत्तीचे विधुर ! त्यांचा भारतीच्या कुटुंबाशी परिचय झाल्यानंतर तिच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन एके दिवशी ते तिच्यापुढे २५०००रु. च्या नोटा टाकून 'हे घे—आपल्या कुटुंबाचे दारिद्र्य मिटव व माझाहि संसार सुखी कर' अशी लग्नाची विनंती करतात. भारती अर्थातच स्पष्ट नकार देते. परंतु मार्तंडरावांनी दोनतीनदा आर्जवे केल्यानंतर आईच्या व वहिणीच्या कल्याणासाठी स्वतःच्या मनाची तयारी करते व स्वतःच पत्र पाठवून संमति देते. पैशांचा हा व्यवहार कोणालाहि सांगणार नाही असे वचन ती मार्तंडरावांपासून घेते. व विवाह होतो. विवाहानंतरच्या पहिल्या भेटीत तिची इच्छा नसतानाहि मार्तंडरावांकडून थोडासा बळजबरीचा प्रकार घडतो. त्यावेळी ती एकदम किंचाळी फोडते व 'पैशाचा व्यवहार कोणाला कळला काय' असे मार्तंडरावांनी विचारताच डोळे फिरवते, हातवारे करते, दांतखिळी बसल्यासारखी करते व तेव्हांपासून तिची वाचाच जाते. व ती भ्रमिष्ट बनते. दोनतीन वर्षे अनेक प्रकारचे प्रयत्न करूनहि कांही फायदा होत नाही. कांहीतरी गुणगुणत बसणे व कांहीतरी लिहीत बसणे एवढा एकच तिचा उद्योग चालला असून एरव्ही ती लहरीप्रमाणे, वेड्याप्रमाणेच वागते. हा सर्व कथाभाग आपल्याला, मार्तंडराव डॉक्टरांना जो पूर्वेतिहास निवेदन करतात त्यावरून समजतो भारती रंगभूमीवर आपल्याला दिसते ती वाचा गेलेली, भकास व वेडसर अशा स्थितीत ! कुमार—वय २१ वर्षे —हा मार्तंडरावांचा, प्रथम पत्नीचा मुलगा ! रसिकलाल—वय २३-२४— हा कुमारचा—मार्तंडरावांच्या कुटुंबाशी अत्यंत घरोबा असलेला—मित्र ! मानसोपचारक डॉक्टर विश्वंभर यांच्याकडे ही केस उपचारासाठी मार्तंडराव सोपवितात. भारतीची केवळ गाण्याची आवड शिल्लक राहिली असते. रसिकलाल यालाहि गाणे येत असल्यामुळे त्याच्या साह्याने तिच्यातील विकृती दूर करण्याचा प्रयत्न डॉक्टर सुरु करतात. परंतु या अवधीत रसिकलाल व भारती यांच्यामध्ये एकमेकांविषयी आकर्षण निर्माण होऊन प्रेमप्रकार सुरु होतात. ही गोष्ट लक्षात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आल्यावर मार्तंडरावांचा संताप अनावर होतो. याचवेळी, भारतीला लग्नाच्या वेळी जी २५००० रु. ची रकम दिली होती ती त्यांनी रसिकलालचे वडील खरेदीमल याजकडून कर्जाऊ घेतली होती ही गोष्टहि सर्वांना कळून चुकते. ती कर्जाची फेड न होऊ शकल्यामुळे खरेदीमल त्यांच्याविरुद्ध कोर्टात केस करण्याचा धाक घालतो व त्यामुळे सगळे घरदार गहाण टाकण्याची त्यांच्यावर पाळी येते. घरात माजलेला भ्रष्टाचार, स्वतःची व घराण्याची धोक्यात आलेली प्रतिष्ठा, डॉक्टरांना विकृतिनिवारणात आलेले अपयश इत्यादि गोष्टींमुळे मनस्ताप असह्य होऊन मार्तंडराव आत्महत्या करतात. भारतीला बंदिस्त करून टाकणारे हे कुंपण मोडून पडल्यावरोबर तिला पुन्हा वाचा फुटते. अशी ही नाटकाची साधारण रुपरेषा.

भारतीच्या विकृतीची कारणमीमांसा, त्यासाठी योजण्यात आलेली उपचार-पद्धति, तिचा परिणाम किंवा तीत आलेले अपयश व या अपयशाची कारण-मीमांसा व उपचारपद्धतीचे मूल्यमापन या गोष्टींना नाटकात प्राधान्य आहे. म्हणून त्यांचा क्रमशः मानसशास्त्रानुसार विचार करू.

भारतीच्या मनोविकृतीचे वर्णन डॉक्टर, 'Strike of the oracular nerves' —विशिष्ट मज्जातंतूंचा संप असे करतात. भारती ही मूळची सद्गुणी तसेच अतिशय स्वाभिमानी व बंडखोर वृत्तीची ! मार्तंडराव जेव्हा २५००० रु. देऊन तिला विकत घेऊ पाहतात तेव्हा तिला अतिशय संताप येतो, त्यांच्याविषयी विलक्षण चीड व घृणा वाटते. ती त्यांना स्पष्ट नकार देते. परंतु वर्षभर विचार केल्यानंतर ती होकार देते. या कालावधीत तिच्या मनात जो संघर्ष चालू होता तो 'स्वाभिमान की स्वकीयांना जीवदान' हा ! एकीकडे संपत्तीच्या चढेलपणा-विरुद्ध चीड, त्याबद्दल बंड करण्याची आकांक्षा ; परंतु दुसरीकडे स्वकीयांचे हाल पाहवत नाहीत म्हणून आपल्या सर्वस्वाचा होम करण्याची सदिच्छा ! शेवटी आपला मूळ स्वाभिमान, बंडखोर वृत्ति, मार्तंडरावांबद्दलची चीड, संताप या सर्व प्रवृत्ति ती दडपून टाकते व मनाला सर्वस्वी न पटणारी गोष्ट—म्हणजे त्यांच्याशी विवाह करते. बाह्यतः जरी ती स्वतः संमति देत असली तरी नाइलाज, अपरिहार्य म्हणूनच ती हे विवाहाचे कृत्रिम बंधन स्वीकारते. परंतु ही गोष्ट, हे सत्य ती जगापासूनच नव्हे तर स्वतःपासूनहि लपवण्याचा प्रयत्न करते—आत्मप्रतारणा करते. तिची विकृति या दडपशाहीच्या, आत्मप्रतारणेच्या पोटीच निर्माण होते. ही विकृति म्हणजे सत्याने तिच्या असत्याचरणाचा घेतलेला सूड आहे.

तांत्रिक मानसशास्त्रीय परिभाषेत हीच मीमांसा पुढील प्रमाणे मांडता येईल. बोधमनाच्या पातळीवर (Conscious mind) निर्माण होणारा कोणताहि विचार, विकार, अनुभव, कोणतीहि प्रवृत्ति अगर इच्छा आपल्याला अप्रिय किंवा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असह्य वाटत असली तर आपण ती बोधमनातून काढून टाकण्याचा प्रयत्न करतो. कांही वेळा ती दडपून टाकतो (Supression), कांही वेळा ती नकळत दडपली जाते (Repression). बोधमनाला जरी त्या अनुभवाची किंवा इच्छा–प्रवृत्तीची विस्मृति झाली असली तरी तो अनुभव किंवा ती प्रवृत्ति नष्ट होत नाही. उलट ती अबोध मनात (Unconscious mind) जाऊन ठाण मांडते. भारतीची मूळ बंडखोर वृत्ति, तिचा स्वाभिमान, तिची चीड, घृणा या सर्व गोष्टी तिने बोधमनाच्या क्षेत्रातून जरी हद्दपार केल्या असल्या तरी त्या सर्व तिच्या अबोध मनात जाऊन बसल्या व तेथून सूत्रे हलवू लागल्या. आईवहिणींच्या सुखासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्याची भारतीची स्वार्थनिरपेक्ष कर्तव्य-बुद्धि म्हणजे तिचा ध्येयात्मा (Super-ego)! या ध्येयात्म्याच्या प्रेरणेनुसार भारतीच्या बोधात्म्याने (Ego) वर्तन केले. आपल्या मूळ प्रवृत्तीनुसार (Id) केले नाही. बोधात्मा हा ध्येयात्मा व अबोधात्मा (Id) यांच्या इच्छा-वासनांमध्ये तडजोड किंवा समन्वय साधण्याचा प्रयत्न करीत असतो. ही तडजोड किंवा समन्वय साधण्यात जेव्हा तो असफल होतो, तेव्हा विकृतीचा संभव निर्माण होतो. भारतीचा बोधात्मा तिच्या ध्येयात्म्याच्या प्रेरणा पचवायला असमर्थ ठरला. तिची विकृति म्हणजे या असफल तडजोडीचाच परिणाम होय ! ती कागदावर लिहीत असलेले किंवा गुणगुणत असलेले स्वर 'धनीसाप धनीमरे'–हे प्रतीकात्मक (Symbolic) आहेत. त्यांतून मार्तंडरावांविषयीची तिची भावना व्यक्त होते. फ्राईडच्या मते मनुष्याच्या हातून कळत वा तकळत घडलेली कोणतीहि कृति त्याच्या कोणत्या तरी दडपलेल्या अगर अतृप्त इच्छेची पूर्ति करीत असते. Every act is a wishfulfilment). मार्तंडरावांविरुद्ध – संपत्तीच्या चढेलपणा-विरुद्ध बंड करण्याची तिची इच्छा होती पण ते ती करू शकली नव्हती. तिची गेलेली वाचा तिच्या मज्जातंतूंनी केलेला हा संप किंवा असहकार म्हणजे तिच्या अबोध मनाने केलेले बंडच, तिच्या बंड करण्याच्या इच्छेची पूर्तीच ! तिची ही विकृति म्हणजे तिच्या अबोध मनाने तिच्याभोवती निर्माण केलेले एक कवच की ज्या द्वारे ती मार्तंडरावांपासून स्वतःचा बचाव करू शकली, त्यांच्याशी असहकार त्यांच्याबद्दलची घृणा, त्यांच्याबरोबर सहजीवन जगण्याबद्दलची तीव्र नापसंती तृप्त करू शकली. तात्पर्य तिच्या विकृतीचे मूळ फ्राईडप्रणीत बालपणी दडपल्या गेलेल्या कामवासनेत (Repressed infantile Sexuality) नाही, ॲडलरप्रणीत न्यूनगंडाच्या भावनेत (Inferiority Complex) मध्येहि नाही. तर तिची दडपली गेलेली, संपत्तिप्रधान समाजरचनेविरुद्ध बंड करण्याची इच्छा, स्वातंत्र्याची इच्छा, तिचा गुलामगिरीचा द्वेष यात आहे. (अपूर्ण)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिचय–परामर्श

अनामिकाची चिंतनिका

लेे०–पु. य. देशपांडे

प्रकाशक.–दि. मा. घुमाळ, नागपूर प्रकाशन नागपूर.
मूल्य ४ रु. पृष्ठे डेमी ११२.

'वानप्रस्थी प्रवाश्यांना सत्याच्या किनाऱ्याची दिशा दाखविण्याची' वासना बाळगणारी ही 'चिंतनिका' सुविख्यात साहित्यिक व तत्त्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांनी जनतेस सादर केली आहे; तिचे मी हार्दिक स्वागत करितो. ही 'चिंतनिका' म्हणजे लालित्याच्या रसात बुडवून रसरसित केलेल्या तात्त्विक पाकपुऱ्यांचे तबकच जणु ! म्हणूनच लेखकास त्याबद्दल धन्यवाद द्यावयाचे !!

लेखक आयुष्याच्या वानप्रस्थी टप्प्यात, दीर्घ प्रवास करून, आता नांदत असल्यामुळे, त्याने आत्मसम प्रवाश्यांकरिता ही 'चिंतनिका' निर्माण करावी हे ठीकच आहे. त्याच्या प्रवासाची दिशा निःसंशय चकित करणारी आहे. गांधीवाद, मार्क्सवाद, नवमानवतावाद इ. वळणे घेत घेत सध्या तरी त्याचा प्रवास अध्यात्मवादाच्या नाक्यावर येऊन ठेपला आहे. त्यामुळे त्याने आधुनिक जागतिक क्रांतीबद्दल, सामाजिक परिवर्तनाबद्दल, विज्ञानवादाच्या मृगजळाबद्दल आणि भारतीय तत्त्वज्ञानाच्या तारकतेबद्दल या 'चिंतनिकेत' जे हृद्गत प्रकट केले आहे, ते बोधरम्य झाले आहे. शुद्ध जिज्ञासा आणि प्रांजळ व प्रामाणिक भूमिका या गोष्टी असल्या म्हणजे लोकापवादाचे घाव झेलीत आपली विचारप्रणालि बदलविण्याचे धैर्य माणूस कसे बाळगतो हे श्री. देशपांडे यांच्यावरून पाहण्यासारखे आहे !

पण, खरे समजा खोटे समजा, ही 'चिंतनिका' वाचून खाली ठेवताना मी चिंतातुर झालो ! विचारांती तसे होण्याची त्रिविध कारणे मला जाणवली. पहिले कारण हे, की 'अनामिक' व 'लेखक' यांच्यात 'सात्म्य' न पहाता केवळ 'साम्य' पाहूनहि 'चिंतनिके'तील वेडगुजरीपणा वाचकास बोचत रहातो. लेखनाचा जो थाट अवलंबिला आहे त्याकरिता 'अनामिक' अवश्य असला, तरी कित्येक ठिकाणी तो हारपलेलाच प्रत्ययास येतो आणि स्वतः लेखकच प्रकटपणे आत्मनिवेदन करताना व आपल्या अपराधांचा पाढा (Confessions) भराभर वाच-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ताना आढळून येतो. त्यामुळे 'चिंतनिके'त धड 'अनामिका'ची तटस्थताहि नाही आणि धड वैचारिक आत्मकथेची सुखद भावोष्णताहि नाही ! त्यामुळे, कशात समरस व्हावे हे वाचकास कळेनासे होते ! !

दुसरे असे, की विचारपरिवर्तनाचा लंबक कांही कांहीदा तर इतका दुसऱ्या टोकास जातो, की त्यामुळे समतोल अभ्यासकास गुदमरल्यासारखे होते. उदा. मार्क्सवादाशी लेखक इतका तादात्म्य पावला होता, की त्याचे पाश तोडतांना तो अतिशय व्याकुळ झाला होता; इतकेच नव्हे तर त्याच्या 'बुद्धिवादी जीवाला झालेल्या जखमा अद्याप ओल्याच राहिल्या आहेत'. (पृ. ५७) तरीहि, ईश्वर पुरवला पण मार्क्सवादाची ऐतिहासिक नियतीची अगडबंब महामाया त्याला बिलकुल नकोशी झाली आहे. (पृ. १७) 'आधुनिक योजनाबद्ध समाजा' बद्दलच्या चिंतनातहि असाच एककल्लीपणा लेखकाने दाखविला आहे. (पृ. ६७) मला मार्क्सवादाच्या 'ऐतिहासिक नियती'ची वा 'योजनाबद्ध समाजा'ची वकिली करण्याचे अर्थातच कारण नाही. पण भावविवशतेने व प्रेरणेच्या (impulse) वायूने माणूस वाहवून नेला गेला म्हणजे दुसरे टोक कसे गांठतो हे मला लक्षात आणून द्यावयाचे आहे. यासंबधात आणखी एका विधानाचा उल्लेख करण्याजोगा आहे. 'वेदांताची, आत्म-ज्ञान-विज्ञानाची विस्मृति, हेच भारतीयांच्या अवनतीचे एकमात्र कारण आहे, असे मला आता अधिकाधिक उत्कटतेने वाटू लागले आहे' (पृ. ५३) हे लेखकाचे विधान–अनामिकाचे मानले तरी !–न्यायनैपुण्याच्या ठसक्यात 'सैवअप्रमा इत्युच्यते' असे असल्याचे निश्चित म्हणता येईल ! या विधानाने मी खराच शंकित झालो. या विधानातील भावार्थ असाच मानावा लागतो, की आमच्या उन्नतीकरिता केवळ वानप्रस्थी प्रवाश्यानाच नव्हे, तर तरुणांना देखील 'अथातो ब्रह्मजिज्ञासा', 'तत्त्वमसि' इ. चे घोट पाजले पाहिजेत; एवढे केले, की सारी उन्नति दाराशी अनाहूतपणे उभी ! वस्तुत: लेखकाला, 'आधी वैराग्य, नंतर प्रबळ ज्ञानेच्छा वा जिज्ञासा, नंतर तदनुसार ज्ञानानुगामी जीवन आणि त्यानंतरच या ज्ञानानुगामी जीवनाची परिणति आत्मज्ञानात वा ब्रह्मज्ञानात घडून येण्याचा संभव–अशी ज्ञानाची प्रक्रिया आहे' (पृ. ९१) ही गोष्ट ठाऊक आहे. तरीहि तो असले दुसऱ्या टोकाचे विधान करितो तेव्हा असेच म्हणावे लागते, की हा भावस्थिरता व व्यवसायात्मिका बुद्धि यांच्या अभावाचा परिणाम आहे !

शंकित होण्याचे तिसरे कारण हे आहे की 'निर्घृण वैचारिक चिरफाडी'तहि (पृ. १०९) लेखकाचे पहिले कांही ग्रह, कांही पीळ, कांही संस्कार, नि:शेष निर्मूल न होता, हरळी प्रमाणे वाढावयास अजूनहि तग धरून आहेत. पृ. १७ वर ईश्वरविषयक जे चिंतन आले आहे, त्यावरून असे वाटते, की मार्क्सवादाच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नियतीच्या कल्पनेने लेखकाचे माथे ठणठणते तसेच ते ईशकल्पनेनेहि ठणठणते. तरी बरे, की 'ईशावास्या'पासूनच त्याच्या वैचारिक देहांतरास प्रेरणा मिळाली आहे ! कर्णाची तरफदारी करताना, 'परमेश्वराचा अवतार मानल्या गेलेल्या श्रीकृष्णाच्या आदेशानुसार' (पृ. २७) अर्जुनाने बाणांचा वर्षाव केला असे जे विधान लेखक करतो, त्यात त्याची 'बंधनापलीकडे जाण्याची मूळ प्रवृत्ति तर नाही ना, असा विचार येऊन वाचक जरा विचकतोच ! वाचकच कशाला ? स्वत: लेखकहि आपल्या पूर्व वृत्तींच्या चाहुलीने विचकलेला दिसत आहे ! भूतकाळाच्या कांही वासना, कांही स्मृति अजूनहि आपल्यात रेंगाळत आहेत व आपले चलाख व अतितरल मन आपल्या आशा–इच्छा–आकांक्षांना वेदान्त परिभाषेची रूपे देत आहे, (पृ. ९८) अशी तक्रार लेखकानेच केली आहे !!

'निर्बुद्ध कर्मठपणा, निर्बुद्ध भक्तिभावना, निर्बुद्ध चालीरीति, रूढी व अंधश्रद्धा यांच्यावर आधुनिक वैज्ञानिकांनी, विचारवंतांनी' जो हल्ला चढविला तो अर्थपूर्णच होता, असे मानणाऱ्यांपैकी मी एक आहे. या कामी मी देखील माझी वाणी व लेखणी वरीच झिजविलेली आहे. आणि याबद्दल मला यत्किंचित्हि पश्चात्ताप होत नाही.' (पृ. ५६) असली विधाने या 'चिंतनिके'त अधूनमधून येतात आणि त्यावरूनच असे वाटते, की लेखकाचा वैचारिक कायापालट अजून पुरता व्हावयाचा आहे. पूर्वीचा आवेश व भंजकता यांच्या मातकट रंगावरोवरच कांही नव बोधांचे उज्ज्वल रंग या 'चिंतनिके'त आढळतात, तेव्हां असेच मनावर बिंबते, की हे अर्धकच्चे रसायन आहे !

चिंतामग्न होण्याचे चौथे कारण 'चिंतनिके'त विज्ञान व भारतीय दर्शने यांच्या विषयीचे विवेचन वाचताना आढळून आलेला अचूकपणाचा अभाव. विज्ञानाच्या बाबतीत हा अभाव 'प्राक्कथना'तील पृ. ७ वरील चर्चेत दिसून येतो. पदार्थ विज्ञानाच्या अभ्यासकास त्यातील लटपट जाणवल्याशिवाय रहात नाही. पण याहिपेक्षा भारतीय दर्शनांची बाजू मांडताना लेखकाने दाखविलेले प्रशंसनीय-साहस वाचकाच्या मनात जसे कौतुक उत्पन्न करिते, तसेच भयहि उत्पन्न करिते. भावस्थिर व परिणतप्रज्ञ न झालेल्याची प्रसन्नता देखील भयावह असते हे सुज्ञ जाणतात. पृ. ४३ वर लेखकाने पाठीचा कणा, कुंडलिनी, षट्चक्र इ. बद्दल जे लिहिले आहे ते ढिलेढाले आहे. त्याने आधुनिकांना बोध तर होत नाहीच उलट दर्शनांच्या अभ्यासकांचा बोध मात्र लुप्त होतो. 'वेदांताची शास्त्र म्हणून जी उभारणी झाली ती न्याय शास्त्राच्या बैठकीवरच. फरक एवढाच की, नैय्यायिक व सांख्यादि इतर दार्शनिक 'द्वैती' आहेत आणि वेदान्ती 'अद्वैती' आहेत. पण हा फरक, न्याय शास्त्राचे अंतिम टोक गांठल्याशिवाय, यथार्थतेने आकलन केल्या जाण्यासारखा नाही.' या वाक्याच्या पुढचेच वाक्य पुढील प्रमाणे आहे. 'वेदांती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वत: प्रामाण्यवादी' आहेत, तर नैय्यायिक 'परमतप्रामाण्यवादी' आहेत. आणि या दोन अर्थगंभीर दर्शनातील हा वाद सरतेशेवटी व्यक्तीला आपापल्या प्रकृत्यनुसार व प्रवृत्यनुसार स्वत:च सोडवावा लागतो'. (पृ. ५५) असली गोडवंगाली विधाने सखोल वाचकास बुचकळयातच टाकतात. असे वाटू लागते, की लेखकाला भारतीय दर्शनांचे मर्म व त्यांचा काटेकोरपणा गवसलाच की नाही ? स्पष्ट बोलावयाचे म्हणजे वाचकास असे वाटते, की लेखक उथळ पाण्यातच तत्त्वविहार करीत आहे. 'आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक असे अखिल सृष्टीचे वैचारिक वर्गीकरण' असल्याची लेखकाची समजूत (पृ. ५३) भ्रामक कशी आहे हे अभ्यासकांना ठाऊकच आहे. खरे म्हणजे ही वस्तुस्थिति आहे, वैचारिक वर्गीकरण नव्हे. नैय्यायिकांच्या मते अनुभव व स्मरण म्हणजे ज्ञान असे एकदा सांगून पुन: 'अनुभव म्हणजेच ज्ञान' (पृ. ८३) असे ठसक्यात सांगणे हे नजरचुकीचे फळ आहे असे म्हटले, तरी, ज्ञान, इच्छा व कृति हे आत्म्याचे तीन गुण आहेत, असे नैय्यायिक मानतात' (पृ ९०) असा पक्ष मांडणे अशास्त्रीय व हेतु मूलकच वाटते. अशास्त्रीय का तर बालांच्या सुखबोधाकरिता म्हणून लिहिलेल्या 'तर्कसंग्रहा'ने देखील 'बुद्ध्यादयोऽष्टौ आत्ममात्रविशेषगुणा:' असे शिकविले आहे. म्हणजे बुद्धि, सुख, दु:ख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, धर्म व अधर्म हे आत्म्याचे गुण आहेत. यातून केवळ तीनच निवडून घेण्यातली हेतुमूलकता स्पष्ट आहे. पाश्चात्य मानसशास्त्रात cognition, affection व conation असे तीन प्रकारचे वर्गीकरण आहे त्याच्या पगडयाचा तो परिणाम आहे. या तीन गुणांच्या निमित्ताने केलेले सर्व विवरण, मला तरी, फार अनाकलनीय वाटते. तसे जवळ जवळ सर्व 'चिंतनिके' भरच आहे. दुसरे उदाहरण घेऊ. पुढील वाक्यांवरून वेदांताच्या अभ्यासकांनी आपापली परीक्षा करून घ्यावी ! 'ब्रह्म हे दुसरे तिसरे कांही नसून केवळ ज्ञान आहे समग्र क्षणक्षण युक्त जीवन ज्ञानानुगामी बनविल्याशिवाय मनुष्याला ब्रह्मपद प्राप्त होणे शक्य नाही. ब्रह्मविद्या ही वस्तुत: केवळ ज्ञानविद्या आहे. या ज्ञानाचा विषय म्हणजे समग्र मानवीजीवन, मानवी जीवनाची इतिकर्तव्यता, मानवी जीवनाचे श्रेय व प्रेय, हाच असू शकतो. येथे बाह्य अनात्म-वस्तु-ज्ञानेच्छा संपुष्टात येऊन आत्म-वस्तु-ज्ञानेच्छा आकारास आली आहे.' (पृ. ९१) ब्रह्म हे ज्ञान नव्हे ती वस्तु आहे, ब्रह्मविद्या ही अनुभवाची बाब आहे इ. सत्ये अंगी मुरलेल्या दर्शनाभ्यासकांना प्रस्तुत लेखकाचे पूर्वोक्त व तसलेच ग्रंथभर विखुरलेले चिंतन भंपकगिरीचे न वाटले, तरी आत्मरतीचे (self-indulgence) वाटेल की काय अशी मला साधार भीति वाटते ! 'चैतन्य म्हणजे, आता, या क्षणाला मला जे जाणवते ते.'(पृ. ९८), 'सारा वेदांत म्हणजे नित्य चिन्मय नित्य नवनवीन असा वर्तमानक्षण, अशी एक नवी व्याख्या माझ्या अंत:

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करणात साकारू लागली आहे.' (पृ. ९७), असल्या बऱ्याच अभिनव चीजा या 'चिंतनिके'च्या हिमकपाटांत (refrigerator) राखून ठेवण्यात आल्या आहेत.

मी चिंतायुक्त होण्याचे पांचवे कारण लोकविलक्षण शब्दप्रयोग व भाषा प्रयोग. हे मी मान्य करितो, की आगळे प्रतिपादन वा मांडणी करणाऱ्याला कांही प्रमाणात 'वाचमर्थोनुधावति' असा अधिकार द्यावा लागतो. आधीच साहित्यिक लेखकास निरंकुशत्वाचा परवाना मिळालेलाच असतो. त्यात पुन: पूर्वोक्त अधिकाराची भर पडली की मग शब्दब्रह्माची अनिर्वचनीयता पराकोटीस जाणेच अनिवार्य. क्षण अनंताचे मीलन, पार्थीव मृत्यु, विद्या म्हणजे मनोविकल्पन-रतता, संवेद्य म्हणजे जे जाणले जाते ते माणूस स्वसंवेद्य प्राणी (self-conscious याला स्वसंवेद्य हा प्रतिशब्द या 'चिंतनिकें'ने दिला आहे !) इ. अनेक दुर्ज्ञेय प्रयोग 'चिंतनिके'च्या मिष्टान्नाचा घास चावताना खडयाप्रमाणे त्रास देतात. दुर्बोधता व दूर्जरता हा तत्त्वचिंतनाचा अलंकार आहे की काय न कळे !

चिंताजनक भाग वगळून 'चिंतनिके'ची चर्वणा केली तर कांही फुटकळ, धावते विचार (stray thoughts) हाती लागतात. अर्थात त्यांचेहि मोल आहेच. पण जागतिक क्रांति, समाजपरिवर्तन व विज्ञानाने उभ्या केलेल्या समस्या यांच्या पार्श्वभूमीवर ते कितपत उठून दिसतील याची मला दाट शंका आहे. 'चिंतनिके वरून एवढे मात्र नक्की वाटते, की लेखकाचे विचाराचे रूळ बदलले आहेत आणि त्यानेच म्हटल्याप्रमाणे, 'सर्व पूर्वग्रह बाजूला सारल्याशिवाय नवे असे जे असेल ते ग्रहणच केले जाऊ शकत नाही' (पृ. १०९) या सत्याचे भान (स्वसंवेद्यता नव्हे !) ठेवणे अवश्य आहे. 'माणूस अनुभवाने कधीहि शहाणा होत नसतो' (पृ. ६५) हे सत्य असेल तर मग खरोखरच फार कठीण 'प्र-संग' आहे !

चिंताजनक भागाबरोबरच कांही सुखविणारे भागहि या 'चिंतनिके'त आहेत, हेहि मला कबूल केले पाहिजे. त्या भागावरूनच लेखकाने गाठलेल्या टप्प्याची महती लक्षात येते. 'हातचे सोडून पळत्याच्या पाठीस लागणे' हेहि वेड असल्याची लेखकास आलेली जाणीव नि:संशय प्रशंसनीय आहे. 'मन अथवा बुद्धि जीवनाचे अधिष्ठान बनू शकत नाही.' (पृ. १८), 'आम्हा भारतीयांच्या विचारप्रक्रियेचे हे संस्कारजन्य विधिलिखित आहे.' (पृ. ३०), 'सांस्कृतिक विधिलिखिताच्या मर्यादेत राहणाऱ्या व्यक्तींनाच उज्ज्वल भवितव्याची आशा करण्याचा अधिकार प्राप्त होऊ शकतो. 'लक्ष्मणाची रेषा' उल्लंघन करणाऱ्याच्या पदरी संकटपरंपरेच्या अखंड श्रेणीपरता दुसरे काय पडणार ?–'(पृ ३७). 'संसारापासून दूर पळून जाणे आणि 'अहं ब्रह्मास्मि'–ची भाषा बोलू लागणे, हा वदतो व्याघाताचाच एक प्रकार आहे, असे मला वाटते. (पृ. ४४), ' . मला कित्येकदा असा गंभीर प्रश्न पडतो की, आधुनिकतेने प्रभावित झालेले हे आज-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कालचे मानवी जग समंजस मानावे की, भयानक व दुराराध्य वेडाने झपाटलेले मानावे ?' (पृ. ४६), 'या असहाय, हतबल अवस्थेत देखील आशेचा किरण जर मला कुठे दिसत असेल तर तो वेदांताच्या, योगाच्या, वैदिक मंत्र-तंत्र विद्येच्या सामर्थ्यशाली व प्रतिभाशाली पुनरुत्थानात' (पृ. ४४) इ. नवत्रोवाची वाक्ये या 'चिंतनिके'त आढळत असल्यामुळे हिरवळीप्रमाणे ती सुखद वाटतात.

'चिंतनिके'तील कांही कांही उद्गार मार्गदर्शक वाटण्याजोगे आहेत. १– आधुनिक मानव, आणि विशेषत: बुद्धिवादी अथवा बुद्धिजीवी आधुनिक मानव, हा अनंत संशयांनी पछाडला गेलेला प्राणी आहे. इतका की, संशयवाद हाच मानवी बुद्धिमत्तेचा कळस होय, असा समज आधुनिक जगावर आता चांगलाच प्रस्थापित झाला आहे एवढेच नव्हे, तर तो प्रतिष्ठाहि पावू लागला आहे. सर्व श्रद्धांचे, सर्व निष्ठांचे अधिष्ठान संशयित करून टाकणे, हीच आधुनिक बुद्धिवाद्यांची खरी करामत....आधुनिक विज्ञानाची ही भयानक करामत माणसाला केवळ संशयात्मा बनवू पहात आहे. (पृ. ५५–५६)

२ 'आपण सुधारले आहोत, प्रगतिशील आहोत, आपल्या पूर्वजांपेक्षा, सनातन्यांपेक्षा श्रेष्ठ आहोत. असे जे अनेक आधुनिक मानतात, तो निव्वळ भ्रम होय'. (पृ. ७२)

३ '....जन्म आणि मृत्यु या दोन टोकांतच माझे जीवन साठले असेल माझ्या मी-त्वाला माझ्या वर्तमान जन्मापूर्वी अस्तित्वच नव्हते आणि मृत्यूनंतरहि त्याला अस्तित्व राहणार नाही, हे जर खरे असेल, तर कोणत्याहि चिरंतन मानवी मूल्यांची भाषाच मला अथवा इतरांना बोलता येणार नाही. कारण या भाषेला कांही अर्थच उरणार नाही.' (पृ. ५८)

वरील सुभाषितांप्रमाणे आणखीहि इतर आहेत. पूर्वग्रह, पीळ, संस्कार यांच्या बरोबरच त्यांचा आढळ होत असल्यामुळे, वाचकास पारिभद्राच्या तिक्त गंधाबरोबरच पारिजाताचा मधुगंध हुंगल्यासारखे वाटते खरे! पण एखादी निसर्गकृति चमत्कारिक सरमिसळीची असत नाही काय ? असो.

सरतेशेवटी, 'चिंतनिके'ची फलश्रुति काय असा प्रश्न मला पडतो. मला तर असे वाटते, की सध्या वेदांताचे दिवस नाहीत. साधन चतुष्टयसंपन्न असा आज कोण आहे ? म्हणूनच 'कलौ वेदान्तिनो भान्ति फाल्गुने बालका इव' म्हणजे शिमग्याच्या दिवशी मुले शोभतात तसे कलियुगात वेदान्ती शोभतात असे आमच्या पूर्वजांनीच बजावून ठेविले आहे. सध्या अतिशय निकड आहे वेगळीच. श्रीसमर्थांच्या समर्थ व खणखणीत शब्दात ती अशी सांगता येईल–

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असेच सुंदर झालो असतो' असे उद्‌गार काढून महाराजांनी तिची सन्मानाने पाठवणी केली. शिवाजी महाराजांच्या लोकोत्तर चारित्र्याचा हा एक उज्वल पैलू या नाटिकेत मोठ्या रेखीवपणे प्रकट झालेला आहे. 'न मातुः परदैवतम्' प्रमाणे 'परस्त्री मातेसमान' हे वचनहि सर्वांना आदरणीय झाले पाहिजे हे तत्त्व या नाटिकेतून मांडलेले आहे.

'धर्माचं पाप' ही आचार्य वापट यांची 'खास विद्यार्थ्यांकरिता स्त्री पात्र विरहित नाटिका' आहे आणि वैराग्याचे बनावट रूप घेऊन लहान मुलांना फुसलावून पळवून नेऊन त्यांच्या कष्टावर जगणाऱ्या तरुण व अतिशय कावेबाज अशा धर्मा नावाच्या एका गुप्त टोळीच्या हस्तकाची कुटिल कारवाई हाणून पाडणाऱ्या पंधरा सोळा वर्षांच्या किशोरांच्या प्रयत्नांना या नाटिकेत नाट्यरूप देण्यात आलेले आहे. नाटिका प्रयोगक्षम आहे एवढे सांगितले म्हणजे पुरे !

शिदोरी हा शंकर कऱ्हाडे यांच्या दहा कथांचा संग्रह. बालकांना आवडेल असेच या कथांचे स्वरूप आहे आणि कोणत्याना कोणत्या सद्‌गुणाचे बीजारोपण बालकाच्या मनात नकळत व्हावे अशा कुशलतेने त्या लिहिलेल्या आहेत.

श्री. धुमाळ यांनी ही सारी पुस्तके प्रकाशित करताना मुद्दाम परिश्रम घेतलेले दिसतात. सुबक छपाई व (काही पुस्तकांच्या बाबतीत) तिरंगी आकर्षक मुखपृष्ठे यामुळे पुस्तकांचे आकर्षण निश्चितच वाढले आहे. बालवाङ्मयात अंतर्गत स्वरूपाइतकेच बाह्यांगहि आकर्षक असणे महत्त्वाचे असते. श्री. धुमाळ यांच्या ते ध्यानात आहे, ही चांगली गोष्ट आहे. त्यांच्या प्रकाशनाकडून अशीच किंबहुना, याहूनहि आकर्षक पुस्तके प्रकाशित होतील आणि बालवाङ्मयाच्या क्षेत्रात नागपूर प्रकाशन या संस्थेला मानाचे स्थान मिळेल अशी अपेक्षा वाळगतो.

–वसंत वऱ्हाडपांडे

शाहिरी वाङ्मय (पृष्ठ १७ वरून)

प्रा. परांजपे––आणि पंडितसाहेब आम्हांलाहि आपले अभिनंदन केले पाहिजे. वस्तुनिष्ठ दृष्टीने शाहिरी वाङ्मयाचा विचार करावयास हवा ही आपली भूमिका व तिला अनुसरुन आपण मांडलेले विचार आम्हाला मार्गदर्शक ठरले हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

प्रा. कुलकर्णी––हो अगदी बरोबर.

प्रा. पंडित––बरं तर, नमस्कार.

प्रा. कुलकर्णी––
प्रा. परांजपे–– } नमस्कार.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugwani) Regd. No. N 356

हे मासिक एम्. जी. सराफ यांनी नागपुर टाईम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर-१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ